**JAYDEEP B. KULKARNI**
B.E. (Civil), MIE, FIV
Chartered Engineer & Approved Valuer
**Office :** Shop No. 1, Runanubandh Renuka, Prof. Colony Chowk, Savedi, Ahmednagar - 414003. | Mo. : 9822049099
**Resi. :** "Shubham", Suyog Grih Mandal, Neal Prof. Colony, Savedi, Ahmednagar - 414 003
Tel. : (0241) 2422459

RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR

सोनेतारण कर्ज
१० ग्रॅमसाठी १२%
फक्त १० मिनिटात रु. ५०,०००/-*
मुदतठेव १३ महिने १०% | वाहन कर्ज योजना १५% | दामदुप्पट ठेव योजना ९० महिने
कैलास नागरी सहकारी पतसंस्था मर्या.
मुख्य कार्यालय : श्रीरंग अपार्टमेंट, शनि मंदिरासमोर, गुजरगल्ली, स्वामी विवेकानंद चौक, अ.नगर. फोन : २३४५९८३.

Volume - 73 | Issue- 143 | Marathi Daily | Wednesday 5/2/2025 | Pages - 6 | Price- Rs. 3

अग्रलेखः एसटी, रिक्षाप्रवास महागल्यानंतर... पान २



नगरमध्ये ११ पासून नगारा संगीत महोत्सव पान ५



नगरमध्ये रविवारी रंगणार 'रनर्स'चा महाकुंभ पान ६

## उठाठेव

– विवेक मेहेत्रे




अत्यंत धूर्त उद्योजक आहेत हं ते...! भाजप–सेना नेत्यांना भेटायला जाताना भगवा शर्ट घालतात, तर पाटण्यामध्ये हिरवा, सोनियाजींना भेटताना पांढरा आणि...!!

### जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांचे आदेश

# फेब्रुवारी अखेरपर्यंत जिल्ह्यातील महामार्गालगतची अतिक्रमणे काढा

**समाचार/नगर-दि.५**


सुरक्षित वाहतुकीसाठी फेब्रुवारी अखेरपर्यंत जिल्ह्यातील महामार्गालगतची अतिक्रमणे त्वरित काढण्यात यावी आणि रस्त्याच्या बाजूला असलेले धोकादायक फलकही काढण्यात यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत दिले.

बैठकीस सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता भरतकुमार बाविस्कर, उपजिल्हाधिकारी अतुल चोरमारे आणि विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी सालीमठ म्हणाले, रस्त्याच्या कडेला असणारी अतिक्रमणे काढण्यासाठी उपविभागीय अधिकारी समन्वयक




अधिकारी म्हणून काम पाहतील. तोडलेल्या रस्ता दुभाजकांची दुरूस्ती करण्यात यावी. दुभाजक तोडणाऱ्या संबंधित पेट्रोल पंप चालक अथवा आस्थापना मालकावर कारवाई करावी. वाहतूक सुरक्षेबाबत सर्वेक्षण करण्यासाठी संस्थेची नियुक्ती करण्यात यावी. नेवासा आणि इमामपूर येथील अपघातप्रवण भागात आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश त्यांनी दिले. किशोरवयीन मुलांकडून होणाऱ्या वाहतूक नियमांच्या उल्लंघनाबाबत जनजागृती करण्यात यावी. शाळांमधून पालकांना याबाबत सूचना देण्यात यावी, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

# भुजबळ अन् खडसेंनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट; चर्चांना उधाण!





**मुंबई, दि. ५–** मंत्रिपद न मिळाल्याने पक्ष नेतृत्वावर नाराज असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री छगन भुजबळ तसेच आणि भाजपाचे जुने ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांनी मंगळवारी रात्री मुंबईत सागर बंगल्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पुन्हा भेट घेऊन चर्चा केल्याने राजकीय चर्चांना उधाण झाले आहे. मुख्यमंत्री आणि भुजबळ यांच्या भेटीत झालेल्या चर्चेची राजकीय वर्तुळात उत्सुकता आहे. दुसरीकडे भाजपाचे जुने ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतल्याने राजकीय निरीक्षकांच्या भुवया उंचावल्या आहेत. मंगळवारी झालेल्या या भेटीने खडसे यांच्या घरवापसीबरोबरच फडणवीस आणि खडसे यांच्यातील राजकीय संघर्ष मिटण्याची शक्यता वर्तविली जात आहे. राज्यातील महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री छगन भुजबळ हे पक्षनेतृत्वावर नाराज आहेत. ही नाराजी त्यांनी वारंवार बोलून दाखविली आहे. गेल्या काही दिवसांत भुजबळ यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी जवळीक वाढली आहे. भुजबळ भाजपात प्रवेश करतील, अशीही चर्चा राजकीय वर्तुळात होते आहे. या पार्श्वभूमीवर भुजबळ यांनी काल मंगळवारी रात्री पुन्हा एकदा मुंबईत सागर बंगल्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन चर्चा केली. या भेटीत काय चर्चा झाली, हे समजू शकले नाही तरी या भेटीची राजकीय वर्तुळात मोठी उत्सुकता आहे. दरम्यान भाजपाचे जुने ज्येष्ठ नेते माजी मंत्री एकनाथ खडसे यांनीही मंगळवारी रात्री मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतल्याने राजकीय निरीक्षकांच्या भुवया उंचावल्या. या भेटीने खडसे यांची लवकरच भाजपात घरवापसी होईल तसेच मुख्यमंत्री फडणवीस आणि खडसे यांच्यातील राजकीय संघर्ष संपेल, अशी चर्चा सुरू झाली आहे. खडसे यांनी मात्र आपण मतदारसंघातील विकास कामांसाठी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली, त्यावेळी कोणतीही राजकीय चर्चा झाली नसल्याचे स्पष्ट केले आहे.

## निवडक

### मुख्यमंत्र्याच्या आष्टी दौऱ्यात मंत्री पंकजा मुंडे-सुरेश धस एकाच व्यासपीठावर



**आष्टी, दि.५–** आष्टी तालुक्यातील विविध विकास कामांच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आजच्या आष्टी दौऱ्यात बीड जिल्ह्यातील राष्ट्रवादीचे मंत्री धनंजय मुंडे यांनी अनुपस्थिती लावली. या कार्यक्रमात पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे आणि आष्टीचे आमदार सुरेश धस हे दोघे एकाच व्यासपीठावर आले. मुख्यमंत्र्यांचा दौरा विकास कामांसाठी असल्याने आज नो कलगीतुरा असे वक्तव्य आ. धस यांनी याआधीच केले होते. दरम्यान, बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यात आलेले मुख्यमंत्री काय भाष्य करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### दर महिन्याला सादर करणार ताळेबंद

# दरमहा २.६१ कोटीची तूट भरून काढण्यासाठी पालिकेची कसरत!

**समाचार/नगर-दि.५**




महापालिका अत्यावश्यक सेवांसह इतर सुविधा पुरवत आहे. वाढत्या नागरिकरणामुळे व लोकवस्ती विस्तारत असल्याने सेवा व सुविधांची मागणी वाढत आहे. त्यामुळे महापालिकेचा दर महिन्याला अत्यावश्यक व बांधील खर्चही वाढला आहे. सद्यस्थितीत दरमहा अत्यावश्यक खर्च १८.९६ कोटींवर पोहचला आहे. त्या तुलनेत महापालिकेला दरमहा जमा होणारे उत्पन्न कमी आहे. त्यामुळे दर महिन्याला २.६१ कोटींची तूट निर्माण होऊन आर्थिक अडचण निर्माण झाली आहे. त्याचा परिणाम नागरी सेवा, सुविधा यासह विकासकामांवर होत आहे. त्यामुळे नागरिकांनी मालमत्ता कर व पाणीपट्टी नियमित भरावी, थकबाकीदारांनी १०० टक्के शास्ती सवलतीचा लाभ घेऊन थकीत कराचा भरणा करावा व जप्तीची कारवाई टाळावी, असे आवाहन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले आहे.

गेल्या २२ वर्षांपासून महापालिकेने मालमत्ता कर व पाणीपट्टीत वाढ केलेली नाही. दुसरीकडे खर्च मात्र दिवसेंदिवस वाढत आहे. महापालिका ही उत्पन्न किंवा नफा कमावणारी संस्था नसली, तरी सेवा सुविधांवर होणार खर्च व उत्पन्न याचा समतोल राखण्यासाठी काही उपाययोजना महापालिका करत आहे. त्याच पार्श्वभूमीवर पाणीपट्टी वाढवण्याचा निर्णय घ्यावा लागला आहे. महापालिकेच्या आर्थिक परिस्थितीबाबत नागरिकांना माहिती असणे गरजेचे आहे. या दृष्टीने दर महिन्याला महापालिका जमा व खर्चाचा ताळेबंद आता नगरकरांसमोर मांडणार आहे. महापालिकेत जीएसटी अनुदानातून १०.८५ कोटी व कर, शुल्काच्या माध्यमातून ५.५० कोटी अशी दरमहा सुमारे १६.३५ कोटींची **(पान ३ वर)**

# वीजप्रश्नी दहिगाव येथे शेतकऱ्यांचा रास्तारोको

**समाचार/नगर-दि.५**



रूईछत्तीसी परिसरातील गावांमधील विद्युत पुरवठा सुरळीत करावा, या मागणीसाठी रुईछत्तीसी गणातील आठ ते दहा गावातील शेतकऱ्यांनी दहिगाव येथे आज रास्ता रोको अंदोलन केले.

गेल्या कित्येक दिवसांपासून या भागात विजेचा लपडांव चालू आहे. गहू, कांदा हरभरा या पिकांना पाणी नसल्यामुळे पिके जळू लागली आहे. आठ तासातील दोन तास देखील विद्युत पुरवठा नसतो. या संदर्भात या परिसरातील शेतकऱ्यांनी कार्यकारी अभियंता यांना निवेदन दिले होते. मात्र, महावितरण कंपनीने दखल न घेतल्यामुळे आज दहिगाव, साकत, रुईछत्तीसी, वाटेफळ, शिराढोण, वडगाव तांदळी, तांदळी वडगाव या गावातील शेतकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन केले. या आंदोलनामुळे नगर–सोलापूर महामार्गावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. या भागात नेहमीच विद्युत पुरवठा खंडीत होत असतो. महावितरण कपंनीच्या अनागोंदी कारभारावर आंदोलनकर्त्यांनी टीका केली. दोन दिवसांत या भागातील विद्युत पुरवठा सुरळीत चालू होईल, असे लेखी आश्वासन महावितरणने दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी माजी जिल्हा परीषद सदस्य बाळासाहेब हराळ, रमेश भांबरे, मधुकर म्हस्के, सुनील म्हस्के, महेश म्हस्के, जयंत शिंदे, उध्दव अमृते, रवी अमृते, बाबासाहेब अमृते, बाळासाहेब बोठे, अनशाबापु म्हस्के, शिवहरी म्हस्के यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

### जीबीएसच्या पार्श्वभूमीवर मनपा सतर्क

# पाण्याचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविणार

**समाचार/नगर-दि.५**

गुलीयन बॅरी सिंड्रोम (जीबीएस) आजाराचे चार रुग्ण शहरातील खासगी रुग्णालयात आढळून आले. सदरचे रुग्ण शहरातील नसले, तरीही महापालिकेने दक्षतेचा भाग म्हणून उपाययोजना सुरू केल्या आहेत. शहरातील पाणी साठवणूक होणारी ठिकाणे, संपवेल यासह जलजन्य आजाराचे रुग्ण आढळणाऱ्या भागातील पाण्याचे नमुने तपासणी संकलित करून ते प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्याचे आदेश प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर यांनी दिले आहेत. यासाठी दोन कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. नगर शहरातील रुग्णालयात जीबीएस संशयित चार रुग्ण आढळल्याचे समोर आले आहे. हे चौघेही रुग्ण शहराबाहेरील असून एकाला पुणे येथे तपासणीसाठी पाठवण्यात आले आहे. तर, तिघांवर शहरातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती सुधारत आहे. सदरचे रुग्ण हे शहराबाहेरील आहेत. मात्र, दक्षतेचा भाग म्हणून महापालिकेच्या आरोग्य विभागाने उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे.

डायरिया सारखा आजार झाल्यानंतर काही रुग्णांमध्ये जीबीएस आजाराची लक्षणे आढळून येत आहे. या पार्श्वभूमीवर प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून पाण्याच्या स्टोरेज टाक्या व संपवेल या ठिकाणचे पाणी नमुने दर ८ दिवसांनी नियमित तपासणीसाठी घेऊन **(पान ३ वर)**

### सहकार दिंडीचे नगरमध्ये उत्साहात स्वागत

# महाराष्ट्राने देशाला सहकाराचा आदर्श दिला- पोपटराव पवार



**समाचार/नगर-दि.५**

सहकार हा महाराष्ट्राचा कणा आहे. सामाजिक, आर्थिक विषमता दूर करण्याचे खुप मोठे काम सहकाराच्या माध्यमातून महाराष्ट्रात घडले आहे.महाराष्ट्र राज्याने संपूर्ण देशाला सहकाराचा एक आदर्श निर्माण करुन दिला आहे. दिंडी एक प्रेरणा आहे. महात्मा गांधींनी दांडी यात्रेच्या माध्यमातून समाजात जनजागृती केली. त्याचप्रमाणे सहकाराच्या दिंडीमुळे जनजागृती होईल, असे प्रतिपादन पद्मश्री पोपटराव पवार यांनी केले.

माळीवाडा बस स्थानक येथे नागपूर ते शिर्डी स्व.वैकुंठभाई मेहता सहकार दिंडीचे आगमन झाले असता, या दिंडीचे स्वागत पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे, राष्ट्रीय मल्टीस्टेट फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश वाबळे, नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष वसंत लोढा, जिल्हा उपनिबंधक गणेश पुरी, जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष प्रशांत गायकवाड, तालुका फेडरेशनचे **(पान ३ वर)**

|| ॐ द्रां दत्तात्रेयाय नमः ॐ || || ॐ नमो भगवते श्री शंकर सद्गुरू राया ||



मुझे वही जानता है, जो खुदको समझता है।

आदरणीय भाऊंना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !



श्री विश्वेश्वर स्वामी महाराज (श्री.राजाभाऊ कोठारी)

गुरूवार दि. ६ / २ / २०२५

रक्तदान ही जनसामान्यांची सेवा यालाच मानुया ईश्वरसेवा

सकाळी १०.०० वा - श्रींचा महाभिषेक
दुपारी १२.३० वा. - श्रींची महाआरती त्यानंतर महाराजांचे दर्शन सोहळा, महाप्रसाद व भजन, प्रवचन होईल.

सायं. ०६.३० वा. कै.श्री.कमलाकर काका तपस्वी यांचे पुतणे श्री.योगेश तपस्वी यांची भजन संध्या होईल. तरी सर्व भाविकांनी याचा लाभ घ्यावा ही नम्र विनंती.

टिप : कृपया पुष्पगुच्छ आणु नये त्यापेक्षा अन्नदान व वैद्यकीय सेवेत आपला सहभाग नोंदवावा !

भाऊंच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तगट तपासणी व रक्तदान शिबिर आयोजित केले आहे तरी मानवतेच्या भावनेतुन जास्तीत जास्त प्रमाणात रक्तदात्यांनी रक्तदान करावे ! वेळ - १०.०० ते ४.००

मंगल भक्त सेवा मंडळ परिवार
मंगल दत्तक्षेत्र, एफ-७०, एम.आय.डी.सी. अहिल्यानगर

संपादकीय

# एसटी, रिक्षाप्रवास महागल्यानंतर...

वाढता खर्च, वाढती महागाई लक्षात घेता काही काळानंतर प्रवासभाडे महागणार ही बाब मान्य केली तरी त्याच्या बरोबरीने हा प्रवास समाजातील सर्व घटकांसाठी सुरक्षा, वेळेत बचत, सुविधाजनक होतो का, हादेखील विचारात घेण्याजोगा विषय आहे. त्यामुळेच अलिकडे राज्यात झालेल्या भाववाढीची चर्चा न करता एकूणच गेल्या काही वर्षांमध्ये प्रवाशांची खरी गरज ओळखून त्यांचे कष्ट कमी करण्यासाठी काही केले गेले का, हे बघावे लागेल. इथे लक्षात घ्यायला हवे की, कोणत्याही देशासाठी; विशेषत: लोकशाही राष्ट्रासाठी सार्वजनिक आरोग्य व्यवस्था, शिक्षण व्यवस्था, विविध सार्वजनिक उद्योग ताकदीने चालणे जितके गरजेचे असते, तितकीच सार्वजनिक वाहतूक व्यवस्था चांगली असणेही अत्यंत गरजेचे असते. आपल्या देशामध्ये रेल्वेचे मोठे जाळे असून ती गोरगरिबांच्या प्रवासाचे साधन आहे. रेल्वेने देश जोडण्याचे काम केले. बुलेट ट्रेन आणणे, 'वंदे भारत'ची संख्या वाढवणे, एसी गाड्यांची संख्या वाढवणे हे आजच्या सरकारचे ध्येय असले तरी त्यातील बऱ्याच गाड्या सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेरच्या आहेत. त्यामुळेच रेल्वेला सामान्य माणसाची वाहतूक व्यवस्था म्हणता न येण्याजोगी परिस्थिती झाली आहे. त्यात सामान्य माणसाच्या सुखकर, सुरक्षित प्रवासाचा विचार दिसत नाही. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था महागडी होत असताना तिच्याकडून नागरिकांच्या कोणत्या अपेक्षा पूर्ण होतात हेदेखील बघावे लागेल. कारण आज सक्षम, परवडणारी, त्याच्या सुलभतेचा विचार करणारी व्यवस्था दिसत नाही. ही तीनही मूलभूत तत्त्वे मान्य केली असली तरी प्रत्यक्षात स्थिती वेगळी दिसते. ती सोयीची वा कार्यक्षम, वेळेत काम करताना तसेच निर्दोष आणि अपघातविरहितही दिसत नाही. आजच्या प्रगत तंत्रज्ञानाच्या काळातही बहुतांश अपघात मानवी चुकांमुळेच झालेले दिसतात. गेल्या काही काळातील अपघातांची माहिती घेतली तर चुकीचे सिग्नल हे महत्त्वाचे कारण दिसते. म्हणूनच नको त्या गोष्टींवर कोट्यवधी रुपये खर्च करण्यापेक्षा सर्व प्रकारचा प्रवास सुकर आणि सुरक्षित करण्यासाठी कार्यक्षम सिग्नल व्यवस्था निर्माण करण्यावर भर देण्याची गरज ओळखायला हवी. आपल्या देशात प्रत्येक राज्याकडे स्वत:ची परिवहन व्यवस्था आहे. ती राज्याकडून कार्यान्वित होते. गेल्या काही वर्षांमध्ये बस वाहतूक चांगली, सक्षम करण्यासाठी बरेच प्रयत्न केले गेले. आलिशान आणि आधुनिक गाड्याही रस्त्यांवर धावायला लागल्या. आरामगाड्यांची संख्या वाढली. त्यांनी सामान्य माणसाच्या आरामदायी प्रवासाची सोय केली, हे नाकारुन चालणार नाही. खेरीज बसचे जाळे खेडोपाडी आहे. ती अत्यंत दुर्गम भागातही पोहोचते. पण दुर्दैवाने ही व्यवस्थाही हवी तेवढी सक्षम नाही. एकीकडे भाववाढ होत असताना बसस्थानकांची स्थिती सुधारण्यासाठी सरकार काय करते, हा प्रश्न पडतो. खरे पाहता स्थानकांमध्ये प्रवाशांना बसण्याची सोय असणे, वेळापत्रक पाळले जाणे, स्थानकांवरील घोषणा स्पष्ट असणे, खाण्यापिण्याच्या चांगल्या सोयी असणे गरजेचे असते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे प्रत्येक स्थानकाजवळ प्रसाधनगृहांची सोय असायला हवी. विशेषत: स्त्रियांचा विचार करुन तेथील सुरक्षा व्यवस्था असणे गरजेचे आहे. मात्र प्रवाशांच्या खिशावरील भार वाढवणारे सरकार याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करते. अगदी मोठ्या शहरांमध्येही काही मोजकी स्थानके वगळता या सगळ्याबाबत अंधारच दिसतो. सोयीअभावी प्रवाशांना हातगाडी विक्रेत्यांकडून अयोग्य पद्धतीने विकल्या जाणाऱ्या अन्नपदार्थांवर अवलंबून रहावे लागते. खरे तर याचा केंद्र पातळीवर विचार होणे गरजेचे आहे. त्यांच्याकडून राज्यांना काही फंड उपलब्ध करुन द्यायला हवेत. एकात्मिक आराखडाही दिला जावा. प्रत्येक राज्याने किमान हा दर्जा राखणे बंधनकारक करायला हवे. प्रत्यक्षात हे होत नाही. उलटपक्षी, आता तर सरकारी बस वाहतूक कमी होऊन खासगी बस वाहतूक वाढताना दिसत आहे. अशी वाहतूक करणाऱ्यांकडे स्वत:ची स्थानके नाहीत. त्या वाटेल तिथे उभ्या केल्या जात असल्यामुळे प्रवाशांना नाहक त्रास सोसावा लागतो. आकडेवारी बघितली तर खासगी बसपेक्षा स्टेट ट्रान्सपोर्टच्या बसेसच्या अपघातांची संख्या बरीच कमी दिसते. याचे कारण म्हणजे सरकारी परिवहन यंत्रणेतील वाहनचालकांना उत्तम प्रशिक्षण, सुरक्षित नोकरी, पगार, पुरेसा आराम, कामाचा ठराविक वेळ हे सर्व असते. मात्र खासगी बसवाहतुकीमध्ये असे कोणतेही नियम नसतात. ते चालक कुठे प्रशिक्षण घेतात, किती वेळ झोपतात, किती तास गाडी चालवतात याचा कोणालाच पत्ता नसतो. स्वाभाविकच ही व्यवस्था वाहतुकीचा स्तर उंचावत असली आणि प्रवाशांची सोय करत असली तरी पूर्णपणे तिच्यावर अवलंबून राहण्यासारखी परिस्थिती नाही. विशेषत: सणासुदीच्या वा सुट्ट्यांच्या काळात या सेवांचे दर तर अवाच्या सव्वा वाढवले जातात. आपल्याकडे दररोज रिक्षाने छोटा प्रवास करणारे अनेक प्रवासीही आहेत. आता रिक्षाचे भाडे महागणार असल्याने त्यांनाही झळ सोसावी लागेल. आज शहरांमध्येच नव्हे तर गावागावात रिक्षा धावतात. त्यांचे आकार आणि रुपे बदलतात इतकेच. गावांमध्ये एकेका रिक्षात १५ माणसेही कोंबलेली दिसतात. आता तर काही शहरांमध्ये दुचाकी वाहनांवरुन प्रवासी वाहतुकीला परवानगी मिळाली आहे. गोव्यापासून सुरू झालेली ही पद्धत आता महाराष्ट्रातही दिसत आहे. मात्र सध्यापुरते बोलायचे तर रिक्षाची भाववाढ करत असताना रिक्षाचालकांची वाढती मुजोरी, भाडे नाकारणे, मीटरपेक्षा अधिक भाडे आकारुन प्रवाशांना अडचणीत आणणे, रिक्षाची स्थिती याविषयी कोणते नियम सुधारणार हेदेखील बघावे लागेल. खेरीज ओला, उबरसारख्या सेवांचा वाढता आवाकाही लक्षणीय आहे. या सगळ्यामध्ये एक प्रकारची सूसूत्रता आणण्याची गरज सरकारने लक्षात घ्यायला हवी.

# विजयकुमार ठुबे यांना डॉक्टरेट पदवी प्रदान



समाचार/नगर-दि.५

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागात स्थापत्य अभियंता म्हणून ३६ वर्ष दिलेल्या योगदानाबद्दल आणि सामाजिक कामाबद्दल अमेरिका येथील साऊथ वेस्टन अमेरिका युनिव्हर्सिटी यांच्यातर्फे दिले जाणारे डॉक्टरेट ही पदवी नुकतीच सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता व मराठा सेवा संघ चळवळीतील ज्येष्ठ नेतृत्व इंजिनिअर विजयकुमार ठुबे यांना नुकतीच चेन्नई येथे प्रदान करण्यात आली.

ठुबे यांनी आपल्या कार्यकाळामध्ये उत्कृष्ट काम केल्यामुळे त्यांना शासनाच्या व अभियंता संघटनेच्या अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे तसेच मराठा सेवा संघाच्या स्थापनेपासून आजपर्यंत सामाजिक भावनेतून त्यांनी अनेक उपक्रम मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष इंजिनियर पुरुषोत्तम खेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबवले आहेत आपल्या शासकीय व सामाजिक कार्याचा मानत डॉक्टरेट पदवी मिळाल्यामुळे गौरव झाला असून मी माझा हा गौरव मराठा सेवा संघाला अर्पण करीत आहे असे त्यांनी पुरस्कार घेतल्यानंतर बोलताना सांगितले.

# भगवान विश्वकर्मा जयंती सोहळा १० फेब्रुवारीला

समाचार/नगर-दि.५

अहिल्यानगर जिल्हा विश्वकर्मा पांचाळ सुतार समाज ट्रस्ट, अहिल्यानगर यांच्यावतीने सोमवार दि. १० फेब्रुवारी रोजी संस्थेच्या मालकीच्या जागेत नवीन टिळक रोड येथे सायंकाळी ६ वाजता बालयोगी संगमनाथ महाराज विशाल गणपती मंदीर ट्रस्ट, माळीवाडा यांच्या हस्ते तसेच संस्थेचे अध्यक्ष मुरलीधर वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली व संस्थेचे सर्व पदाधिकारी व विश्वस्त मंडळ व समाज बांधव यांच्यावतीने भगवान विश्वकर्मा जयंती सोहळा साजरा करण्यात येणार आहे.

सकाळी १० ते १२ वा. सत्यनारायण महापूजा श्री प्रभू विश्वकर्मा ग्रंथाचे वाचन व प्रभू विश्वकर्माची महाआरती होईल. दुपारच्या सत्रात दुपारी २ ते ५ या वेळेत संगीत भजनाचा कार्यक्रम होईल. सायंकाळच्या सत्रात ५ ते ६ या हभप सत्यनारायण विश्वकर्मा यांच्या प्रवचनाचा कार्यक्रम होईल. सकाळी ६ वाजता प्रभू विश्वकर्मा जयंती उत्सव कार्यक्रम होईल.

# जागते रहो...

आरके फिल्मस्‌चे बरसात, आवारा, श्री ४२०, बूट पॉलिश, आह या चित्रपटांनी 'आरके' चं फिल्मी दुनियेत एक मोठं नाव निर्माण केलं. 'आरके' नाव वाचूनही लोक थिएटरवर गर्दी करु लागले. आता राजने एक वेगळाच प्रयोग करायचं ठरवलं. एक बंगाली कथा त्याच्या वाचण्यात आली. ती त्याला इतकी आवडली की त्यावर चित्रपट निर्मिती करण्याचं निश्चित केलं. विशेष म्हणजे कथा बंगाली असल्याने त्या कथेचे लेखक शंभू मित्रा व अमित मैत्रा यांच्याकडे कथा पटकथा लेखनासह दिग्दर्शनाचीही जबाबदारी सोपवली. (बुट पॉलिश नंतर स्वतःच दिग्दर्शित न केलेला हा त्याचा तिसरा चित्रपट)




'जागते रहो' चे दिग्दर्शक बंगाली असल्याने किंवा स्वतः राज नसल्याने शंकर जयकिशनने संगीत देण्यास नकार दिला आणि आरकेच्या बॅनरसाठी प्रथमच सलील चौधरीला संधी मिळाली. पण त्यातही एक गंमत म्हणजे या चित्रपटातील 'ऐवे दुनिया देवे दुहाई... तो कि मैं झूठ बोलिया' हे गाणं प्रेमधवनने लिहिलं त्याचप्रमाणे स्वतःच संगीतबध्द केलं होतं. शंकर जयकिशन नसले तरी शैलेंद्रने बाकी गाणी लिहिली. पण हसरतला एकही नाही.

जागते रहो मध्ये नायक नायिका, प्रेमप्रकरण वगैरे प्रकार अजिबात नाही. खरं म्हणजे ही एक ब्लॅककॉमेडी आहे आणि समाजाचा ढोंगीपणा हाच खरा विषय व हा विषयच नायक. तहान लागली म्हणून एका इमारतीत पाणी पिण्यासाठी आत जाणाऱ्या एका गावाकडच्या भाबड्या माणसाला चोर समजून सारे लोक एखाद्या कुत्र्यासाखे त्याच्या मागे लागतात आणि भेदरुन तो दिसेल त्या घरात लपतो अनेक अवैध धंदे तो उघड्या डोळ्याने पाहतो व त्याला पकडण्याच्या नादात अनेक अवैध धंदे करणारे तथाकथित प्रतिष्ठित उघडे होतात. इ. 'जागते रहो' ला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली पुरस्कार मिळाले पण आपल्या पब्लिकने 'जागते रहो' ला पार झोपून टाकलं. एकदम फ्लॉप. कदाचित यात नेहमीचा मसाला म्हणजे प्रेम, नाचगाणी वगैरे नसल्याने प्रेक्षकांना नावडला असावा. संपूर्ण सिनेमात राजकपूर प्रारंभी 'पानी' व अगदी शेवटी चार वाक्य बोलतो तेवढच. अन्यथा संवाद एकही नाही आणि गाणं म्हणण्याचा प्रश्नच नाही. स्वतःला एकही गाणं नसलेला राजचा हा एकमेव चित्रपट. यात नायिका हा प्रकार नसला तरी रात्रभर तहानलेल्या राजला सूर्योदयाच्या वेळी त्याला पाणी देताना नर्गिस 'जागो मोहन प्यारे' या गाण्यापुरती दिसते. राज नर्गिस एकत्र असलेला हा 'आरके'चा शेवटचा चित्रपट. पण जागते रहो पाहणे हा एक विलक्षण वेगळा अनुभव. राजच्या अभिनयाची कमाल यात दिसते. बाकी तो चार्लीची नक्कल मारायचा पण जागते रहो द बेस्ट!

जागते रहो चालला नाही तरी नावलौकिक मात्र खूप कमावलं. त्यानंतर राजने 'आरके'मार्फत 'अब दिल्ली दूर नही' हा आणखी वेगळ्या विषयाचा प्रोजेक्ट हाती घेतला, दिग्दर्शनाची जबाबदारी 'अमरकुमार' या आपल्या आणखी एक असिस्टंटवर सोपवली. राजकपूर फक्त निर्माता. बाकी कलाकार अगदी दुय्यम. नायक नायिकाची ही कथा नव्हे. एका छोट्या मुलाला भारताचे पंतप्रधान (पं. नेहरु) यांना भेटण्याची तीव्र इच्छा असते व भेटून त्यांना काहीतरी सांगायचं... एवढासा विषय दिग्दर्शकाने मस्त प्रेझेंट केला. मास्टर रोमी हा बाल कलाकार व त्याला दिल्लीकडे घेऊन जाणारा याकूब या दोघांवरच जास्त फोकस. दिल्लीला गेल्यानंतर मास्टर रोमीला भेटलेल्या मुलांच्या गर्दीमध्ये बालकलाकार म्हणून अमजद खान. तसेच मोहन चोटी, जगदीप इ. दिसतात.

आरकेचा सिनेमा असला तरी जागते रहो प्रमाणेच या चित्रपटाला शंकर जयकिशनचं संगीत नव्हतं. पण त्यांचा मुख्य असिस्टंट दत्ताराम (वाडकर) याने 'अब दिल्ली दूर नही'ला लाजवाब संगीत दिलं व स्वतंत्रपणे संगीत देण्याची संधी दत्तारामला प्रथमच मिळाली. 'छून छून करती आई चिडिया' (रफी) हे सर्वात प्रसिध्द गाणं. लताचं यातलं एकमेव गाणं म्हणजे 'जियो मेरे लाल' 'अब दिल्ली दूर नही'. ला 'बूट पॉलिश' इतके उदंड यश मिळालं नाही. पण बऱ्यापैकी चालला. आरकेचा हा एकमेव लो बजेट सिनेमा असावा. एक चित्रपट रिलीज झाला की पुढच्या चित्रपटाची लगेच सुरुवात करायची हे राजचं पक्क धोरण होतं. त्यादृष्टीने राजने तयारी सुरु केली. जयप्रकाश नारायण यांनी त्याकाळात डाकूंना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी एक मोठी चळवळ सुरु केली. तो विषय राजच्या डोक्यात घोळू लागला... त्यावर कोणता चित्रपट ते पुढील अंकात.

**- अनंत दसरे.**




## राशीभविष्य

- **मेष** : आर्थिक करार लाभदायक ठरतील. चोरीबाबत सावधगिरी बाळगावी. प्रकृतीकडे लक्ष द्यावं.
- **वृषभ** : व्यापारवृध्दीसाठी अनुकूलता राहील. जुनी येणी विनासायास वसूल होतील. प्रवासात काळजी घ्या.
- **मिथुन** : नव्या जबाबदाऱ्या विचारपूर्वक घ्याव्या. मनाविरूध्द घटना संभवतात. बेरोजगारांना संधी लाभतील.
- **कर्क** : सुखद वार्ता कानी येईल. रखडलेली कामं मनाजोगी होतील. विवाहाच्या प्रयत्नांना चालना मिळेल.
- **सिंह** : अपेक्षित फलप्राप्तीचे योग आहेत. घाईगडबडीने कोणतेही निर्णय घेऊ नका. स्थावर सौख्य लाभेल.
- **कन्या** : कार्यक्षेत्रात तुम्ही म्हणाल ती पूर्व दिशा असेल. अचानक धनलाभ संभवतो. महत्त्वाच्या भेटी होतील.
- **तूळ** : मोठे व्यवहार टाळावेत. स्थापत्य, अभियांत्रिकी क्षेत्रात संधी लाभतील. कलागुणांना वाव मिळेल.
- **वृश्चिक** : धरसोडीचं धोरण टाळावं. आपलंच खरं हा अट्टाहास ठेवू नये. विद्यार्थ्यांची अपेक्षित प्रगती होईल.
- **धनु** : कौटुंबिक बाबतीत चिंता राहील. स्थावर प्रश्न प्रलंबित राहतील. अपेक्षित भेटीबाबत विचारानं रहावं.
- **मकर** : कारकिर्दीत नव्या संधी लाभतील. वरिष्ठांकडून कामाचं कौतुक होईल. हातून धार्मिक कार्य घडेल.
- **कुंभ** : कौटुंबिक वाद वाढवू नयेत. भागीदारी व्यवसायात विचारानं रहावं. महत्त्वाचे करार मनाजोगे होतील.
- **मीन** : स्वमताग्रह टाळायला हवा. खऱ्या हितचिंतकांची योग्य पारख करा. वाढत्या खर्चाला आवर घालावा.

## ६ फेब्रुवारी

दिनविशेष

- **१९३९** : बडोद्याचे महाराज सर सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांचं निधन.
- **१९४०** : नॉर्वेच्या सागरी हद्दीत आश्रयास असणाऱ्या जर्मन तेलवाहू नौकेवरील ३०० ब्रिटिश खलाशांची एच.एन.एस. कोर्सेक या विनाशिकेने सुटका केली.
- **१९४४** : चित्रपटसृष्टीचे जनक समजले जाणारे धुंडिराज गोविंद उर्फ दादासाहेब फाळके यांचे निधन.
- **२०१४** : सिद्ध समाधी योगवर्गाचे गुरू श्री ऋषी प्रभाकर यांचं निधन.

आरोग्यमंत्र

## ...म्हणून होतं विस्मरण

वैद्यकीय शास्त्रात झालेल्या प्रगतीमुळे मानवी मेंदूतील घडामोडी, त्यातील यंत्रणांची नेमकी माहिती या संदर्भात बऱ्याच बाबींवर प्रकाश टाकणं शक्य झालं आहे. खरं तर वाढत्या वयानुसार आपल्या मेंदूतही बरेच बदल घडत असतात. हेच बदल स्मरणशक्ती कमी व्हायला कारणीभूत ठरतात. म्हणूनच वाढतं वय आणि कमी होत जाणारी स्मरणशक्ती याबाबत पुरेशी माहिती करून घेणं गरजेचं ठरतं.



वयाच्या वीस वर्षांनंतर माणसाच्या मेंदूतल्या पेशी नष्ट व्हायला सुरूवात होते. सुरूवातीला ही प्रक्रिया मंद असते. मेंदूच्या पेशी कार्यरत राहण्यासाठी विशिष्ट रसायनांची गरज असते. ही रसायनं आपल्या शरीरात स्रवत असतात. वयानुरूप त्यांचं प्रमाण कमी होऊ लागतं. वय वाढल्यानंतर माहिती साठवून ठेवण्याच्या मेंदूच्या पद्धतीत बदल होऊ लागतात. यामुळे अनेक गोष्टी आठवताना त्रास होतो. बालपणातल्या किंवा नुकत्याच घडलेल्या काही गोष्टी आठवताना त्रास होत नाही. पण मधल्या काळात घडलेल्या काही घटना पटकन आठवत नाहीत. अलिकडेच भेटलेल्या माणसांची नावं, आदल्या दिवशी घेतलेली न्याहरी, जेवण विस्मरणात जाणं ही याची लक्षणं मानली जातात. वाढत्या वयासोबत इतर काही कारणांमुळे विस्मरण होऊ शकतं. त्यात नैराश्य, शारीरिक आजार, स्मृतीभ्रंश, अमली पदार्थांचं सेवन, डोक्याला दुखापत, स्ट्रोक तसंच अतिरिक्त मद्यपान यांचा समावेश आहे. विस्मरणाचा दैनंदिन आयुष्यावर परिणाम होणं धोकादायक मानलं जातं. छोट्या गोष्टी विस्मरणात जात असतील तर डॉक्टरांचा सल्ला घेणं गरजेचं आहे.

महत्त्वपूर्ण काही...

## अशी असते हातांची क्षमता

दोन्ही हातांनी एका वेळी काम करणं अवघड असतं. आपण जवळपास प्रत्येक काम उजव्या हाताने करतो. डावखुऱ्या व्यक्ती डाव्या हाताचा वापर करतात. लिहिण्याचं काम आपण एकाच हाताने करतो. पण काही लोकांमध्ये दोन्ही हातांनी काम करण्याची क्षमता असते. वैद्यकीय भाषेत या क्षमतेला 'एम्बिडेक्सटेरिटी' म्हटलं जातं.

एम्बिडेक्सटेरिटी म्हणजे दोन्ही हातांनी काम करण्याची क्षमता. यामुळे एखादी व्यक्ती दोन्ही हातांवर सारखंच नियंत्रण ठेऊ शकते. टेनिस, मार्शल आर्ट यासारख्या खेळांमध्ये तसंच विशिष्ट प्रकारची वाद्यं वाजवताना ही क्षमता उपयुक्त ठरते. वैद्यकशास्त्रानुसार उजव्या हातानं काम करणाऱ्या व्यक्तींच्या मेंदूचा डावा भाग अधिक कार्यरत असतो तर डावखुऱ्या व्यक्तींच्या मेंदूचा उजवा भाग अधिक कार्यरत असतो. पण एम्बिडेक्सटोरिटीमध्ये दोन्ही भाग समान पद्धतीने कार्यरत राहतात. ही क्षमता जन्मत: मिळत असली तरी अनेकजण सरावानं ती विकसित करू शकतात. दोन्ही हातांनी काम करणाऱ्या व्यक्ती जास्त कल्पक असतात. याचे काही फायदे असले तरी याचे तोटेही असतात.

सल्ला मोलाचा

## घालवा नकोसे गवत

बागेमध्ये सतत उगवणारं गवत ही एक डोकेदुखी असते. झाडांच्या आसपास वाढणारं गवत सतत कापावं लागतं, अन्यथा झाडांच्या वाढीवर विपरित परिणाम दिसून येतो. कापल्यानंतर काही दिवसातच गवत पुन्हा वाढतं. म्हणूनच यावर कायमस्वरूपी इलाज शोधावा. काही घरगुती उपायानं हे साधता येतं. ✻ अनावश्यक गवत नाहीसं करण्यासाठी व्हाईट व्हिनेगरचा उपयोग होतो. १ मग पाण्यात १ कप व्हाईट व्हिनेगर घाला. गवत कापल्यानंतर त्या जागी हे पाणी शिंपडा. यामुळे त्या जागी गवत पुन्हा उगवणार नाही. ✻ झाडापाशी गवत नको असेल तर मीठ घालून ठेवावं. यामुळे आजूबाजूला गवत उगवत नाही. ✻ कापलेल्या गवतावर ब्लीच पावडर भुरभुरल्यास गवत उगवत नाही. ✻ गवतावर अल्कोहोल ओतल्यासही ते जळून जातं आणि पुन्हा उगवत नाही. ✻ गवत वाढू नये यासाठी उकळतं पाणी टाकणं हा देखील एक चांगला पर्याय आहे. यामुळे गवत होरपळतं आणि पुन्हा उगवत नाही. उन्हामुळे करपलेलं गवत जाळून टाकावं. यामुळे जमीन सकस बनते.

## पंचांग

**गुरूवार, ६ फेब्रुवारी २०२५**
विक्रम संवत्सर, शके १९४६,
माघ शु. ९, नक्षत्र : कृत्तिका
चंद्रराशी : वृषभ, ब्रह्मा योग,
सूर्योदय : ७.११, सूर्यास्त : ६.३४

## फॉरवर्डस

प्रेमात पडणाऱ्यांची, त्यापायी विव्हळ होणाऱ्यांची संख्या वाढतेय.

**शायरी करनेवाले बढते जा रहे है,**
**ए–मोहब्बत लगता है, तेरा धंदा जोरोपर है।**

## वाचा तर खरं

उचकी लागल्यानंतर कोणीतरी आठवण काढत असेल, अशा खुळ्या समजात असाल तर वास्तव समजून घ्या. छाती आणि पोट यांच्यामध्ये एक स्नायूंचा पडदा असतो. या स्नायूला मेंदूचे आदेश पोहोचवण्यासाठी फ्रेनिक नावाची नस असते. या पडद्याला वारंवार उद्दिपन मिळालं अथवा फ्रेनिक नसेमुळे वारंवार उद्दिपन झालं तर उचकी लागते. काही शारीरिक विकारांमुळे उचकी येते तर काही मानसिक रोगही यास कारक ठरत असतात. शरीरात आम्ल आणि अल्कली यांच्या प्रमाणातील बदल उचकीस कारक ठरतो.

करिअरवाटा

## कायद्याच्या शिक्षणासाठी...

दोस्तांनो, आजकाल अन्य क्षेत्रांप्रमाणे कायद्याच्या क्षेत्रातही कारकिर्दीच्या नवनवीन संधी उपलब्ध होत आहे. त्यादृष्टीने कायद्याच्या विविध विभागांमध्ये तुम्ही नैपुण्य मिळवू शकता. कायद्याचा अभ्यास केल्यानंतर स्वत:ची प्रॅक्टिस सुरू करता येते. शिवाय कंपन्यांमध्ये कायदा सल्लागार म्हणून नोकरीची संधीही प्राप्त होते. अर्थात, यासाठी कायदा महाविद्यालयांमध्ये प्रवेश घ्यायचा तर क्लॅट परीक्षा द्यावी लागते. या परीक्षेतल्या गुणांच्या आधारावर तुम्हाला चांगला महाविद्यालयात प्रवेश मिळू शकतो. कायद्याच्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेताना विशिष्ट शाखेची अडचण नसते. त्यामुळे कोणत्याही शाखेतले विद्यार्थी ही परीक्ष देऊ शकतात.




या परीक्षेत तसंच अभ्यासक्रमात दरवर्षी काही बदल केले जातात. २०१५ पासून २०१९ पर्यंत क्लॅट परीक्षेच्या पद्धतीत बरेच बदल करण्यात आले आहेत. हे बदल महत्त्वाचे आहेत. सुरूवातीला क्लॅट परीक्षा कॉम्प्युटवर आधारित होती. या परीक्षेत विविध विषयांवरचे प्रश्न विचारले जात. पण २०१५ मध्ये ही परीक्षा पद्धती बदलण्याची मागणी करण्यात आली. त्यामुळे २०१६ मध्ये साधा पेपर काढण्यात आला. यामुळे कट ऑफ वाढलं. क्लॅट २०२० मध्येही बरेच बदल करण्यात आले आहेत. यंदा १२० ते १५० प्रश्न विचारले जाणार आहेत. त्यामुळे या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी जोरदार तयारी करायला हवी.

खेचाखेची

## दोघाचं भांडण...

एकदा शेजारी राहणाऱ्या दोघांचं जोरात भांडत सुरू होतं.

**पहिला** : फार बोललास तर तुझे बत्तीस दात पाडीन.

**दुसरा** : हात तर लावून दाखव, मी चौसष्ट दात पाडीन.

**तिसरा** : (कुत्सितपणे) अहो, पण माणसाच्या तोंडात बत्तीसच दात असतात.

.

**दुसरा** : माहीत होतं तुम्ही मध्ये बोलणार, म्हणून मी तुमचेही दात मोजले.

वेगळे काही

सापाचं नाव घेतलं तरी अनेकांच्या अंगावर भीतीने काटा येतो. अशा वेळी एखादा माणूस कोब्राचं चुंबन घेतो असं सांगितलं तर त्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही. पण, थायलंडच्या पट्टायामध्ये अशी एक व्यक्ती आहे. हा माणूस सापांचं सहज चुंबन घेतो. असं करताना त्याला कोणी पाहिलं तर पाहणारे लोक थक्क होऊन जातात. या माणसाला सापांची अजिबात भीती वाटत नाही. या व्यक्तीचं नाव समजू शकलेलं नाही. पण, त्याच्या अशा स्टंटची चर्चा साऱ्या जगामध्ये होत असते.

स्कील डेव्हलपमेंट

## व्हीएचा सुलभ पर्याय

'वर्क फ्रॉम होम' ही संकल्पना आजकाल भलतीच रूढ होत आहे. त्याद्वारे मुलांकडे लक्ष देत तसंच संसाराच्या जबाबदाऱ्या पार पाडत कारकिर्दीचा आनंद घेणं शक्य होत आहे. त्यादृष्टीने घरी बसून करता येतील असे अनेक व्यावसायिक पर्याय उपलब्ध आहेत. त्यातीलच एक म्हणजे व्हर्च्युअल असिस्टंट (व्हीए). यातील कामाची पद्धत तसंच संधींविषयी जाणून घेऊ...




प्रत्येक व्यावसायिकाला कामाबाबज मदतीची, मार्गदर्शनाची गरज असते. अशा वेळी लोक फ्रीलान्सर्सची मदत घेतात. हे फ्रीलान्सर्स व्हर्च्युअल असिस्टंट म्हणून काम करतात. व्हर्च्युअल असिस्टंट व्यावसायिकाला त्याच्या गरजेप्रमाणे मार्गदर्शन करतो. या क्षेत्राशी संबंधित कौशल्यं आत्मसात केली तर तुम्हीही घरी राहून व्हर्च्युअल असिस्टंटची जबाबदारी पार पाडू शकता. हे काम बऱ्याच अंशी प्रशासकीय किंवा सचिवांच्या कामासारखं असू शकतं. या क्षेत्रात नव्या असाल तर फ्रीलान्सर किंवा अपवर्कसारख्या वेबसाईट्सवर प्रोफाइल तयार करा. त्यानंतर कामाचा शोध घ्या. बऱ्याच फेसबुक ग्रुप्सवर व्हर्च्युअल असिस्टंटची गरज असल्याच्या जाहिराती दिलेल्या असतात. तातडीने काम हवं तर या ग्रुप्सना भेट द्या.

Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahilyanagar (Ahmednagar) (M Corp), Dist.Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahilyanagar (M Corp), Dist Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code- 414 001, Maharashtra.
Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहिल्यानगर (अहमदनगर) (एम कॉर्प), जिल्हा–अहिल्यानगर (अहमदनगर), पिन कोड– ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा– अहमदनगर, पिन कोड– ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले.
संपादक– स्वाती महेंद्र कुलकर्णी. दूरध्वनी– २३४५२७०, २३४७०८६, मो.– ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

**अर्ज़ किया है...**

*तंदुरुस्ती से तो बेहतर थी मेरी बिमारी*
*वो कभी पूछ लेते हे कि हाल अच्छा है*
-हफीज़ जौनपुरी

प्रेमात पडलेल्या व्यक्तीसाठी हा शेर आहे. हल्ली साधी विचारपूससुध्दा दुर्लभ झाली आहे. शायर म्हणतात, तंदुरुस्त असण्यापेक्षा आजारी पडणे चांगले होते कारण त्यावेळी तब्येतीची चौकशी केली जायची, यामुळे बोलणे तरी व्हायचे.

समाचार

बुधवार दि. ५ फेब्रुवारी २०२५ पान ३

# ‘अर्बन’च्या पाच लाखांवरील ठेवीदारांना ५० टक्के रक्कम मिळण्याचे संकेत

**समाचार/नगर-दि.५**

अवसायनात निघालेल्या अर्बन सहकारी बँकेने (बहुराज्यीय) ठेवी विमा संरक्षण महामंडळाला (डीआयसीजीसी) ३७९ कोटी १२ लाख रुपयांची परतफेड केल्यामुळे आता ५ लाखांवरील ठेवीदारांना रक्कम परत करण्यासाठी आवश्यक असलेला ना हरकत दाखला मिळवण्याचे प्रयत्न अंतिम टप्प्यात आले आहेत. सध्या ५ लाखांवरील ठेवीदारांना एकूण २१० कोटी रुपयांचे देणे आहे. यापैकी किमान ५० टक्के म्हणजे ११० कोटी रुपयांचे वाटप मार्चपर्यंत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

अर्बन बँक बचाव समितीचे राजेंद्र गांधी, राजेंद्र चोपडा, डी.एम. कुलकर्णी, ॲड. अच्युत पिंगळे यांनी ही माहिती दिली. दोन दिवसांपूर्वी पालकमंत्री राधाकृष्ण विखे, जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ, जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत बँकेचे अवसायक गणेश गायकवाड यांनी बँकेच्या आर्थिक परिस्थिती सांगताना ही माहिती स्पष्ट केली. त्याआधारे बँक बचाव समितीने हा दावा केला आहे. बँकेची सरकारी रोख्यातील गुंतवणूक १६३ कोटी रुपये विक्री करण्यास मनाई होती. परंतु आता ‘डीआयसीजीसी’चे देणे फेडल्याने ही गुंतवणूक विकण्यास लवकरच परवानगी मिळेल व ५ लाखांच्या आतील ज्या छोट्या ठेवीदारांनी अद्यापि केवायसी पूर्तता न केल्यामुळे ३० कोटींची तरतूद व इतर आवश्यक तरतुदी वगळून ११० कोटी रुपये ठेवीदारांचे परत देण्यासाठी उपलब्ध होऊ शकतात.

सध्या ५ लाखांवरील ठेवीदारांना एकूण २१० कोटी रुपये देणे आहे. त्यातील ५० टक्के रक्कम ठेवीदारांना उपलब्ध होत आहेत. उर्वरित ५० टक्के रक्कम बँकेच्या थकीत कर्जदारांकडून एकूण येणे ९०० कोटींचे आहे. या थकीत कर्जदारांवर कडक कारवाई करण्यासाठी जिल्हा प्रशासन व पोलीस खात्याची मदत झाली तर ठेवीदारांना संपूर्ण रक्कम परत करता येईल. यासाठी पालकमंत्र्यांनी त्रिसदस्य समिती नियुक्त केली आहे.

या समितीत निवासी उपजिल्हाधिकारी, पोलिस उपअधीक्षक व बँक प्रतिनिधी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बँकेच्या सत्ताधारी संचालकांच्या भ्रष्ट कारभारामुळे बँक ४ ऑक्टोबर २०२४ रोजी बंद पडली. परंतु अवसायक गायकवाड व बँक बचाव समितीच्या कायदेशीर पाठपुराव्यामुळे केवळ १४ ते १५ महिन्यानंतच ठेवीदारांना पूर्ण रक्कम मिळण्याचे संकेत आहेत. याबाबत अर्बन बँक ही एकमेव उदाहरण असल्याचे राजेंद्र गांधी व राजेंद्र चोपडा यांनी सांगितले.

अर्बन बँकेमध्ये अनेक बड्या व्यक्ती, बड्या संस्थांच्या कोट्यावधींच्या ठेवी अडकल्या आहेत. मात्र त्यांच्याकडून कायदेशीर पाठपुरावा केला जात नाही. केवळ समितीचे ॲड. पिंगळे मोफत कायदेशीर पाठपुरावा करत आहेत. त्यांनी तब्बल ३८ खटले कोणतेही शुल्क न घेता लढले. त्यामुळे अवसायनातील बँककडून दीड वर्षातच पैसे परत मिळू लागले आहेत, असे राजेंद्र चोपडा यांनी सांगितले. बँकेतील एकूण लॉकरपैकी किमान २० टक्के लॉकर अद्यापि बंदच आहेत, या लॉकरमध्ये काय आहे, याबद्दल सभासदांत उत्सुकता असल्याचे राजेंद्र गांधी म्हणाले.

पान १ वरुन

## सहकार दिंडीचे नगरमध्ये उत्साहात स्वागत

अध्यक्ष किसनराव लोटके, राजीव गांधी पतसंस्थेचे संस्थापक उद्धवराव दुसुंगे, मराठा सेवा पतसंस्थेचे उपाध्यक्ष बाळासाहेब काळे उपस्थित होते. वसंत लोढा म्हणाले, स्व.वैकुंठभाई मेहता सहकार दिंडीचे आगमन नागपूर येथून नगर येथे झाले आहे. महाराष्ट्रात पतसंस्था चळवळ रुजली आहे. पतसंस्थेबद्दलचा जनतेचा विश्वास वृद्धिंगत व्हावा, हा विचार घेऊन सहकार दिंडी संपूर्ण महाराष्ट्रात जात आहे. या दिंडीचे नगर येथे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय परिषदेच्या माध्यमातून पतसंस्था चळवळीला शासनाची बळकटी मिळावी. या हेतूने ९ फेब्रुवारी रोजी शिर्डी येथे आंतरराष्ट्रीय परिषद होत आहे. या सरकार दिंडीत लेझीम पथक, सनई वादक, नगर जिल्ह्यातून आलेले सहकार दिंडीचे चित्ररथ, तसेच महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचा आकर्षक चित्ररथ सहभागी झाला होता. सहकार दिंडीची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळापासून झाली. यानंतर सहकार दिंडी माळीवाडा वेस, माणिक चौक ,कापड बाजार, डाळ मंडई ,आडते बाजार, बंगाल चौकी मार्गे मार्केट यार्ड येथे जाऊन तेथे सहकार दिंडीचा समारोप करण्यात आला.

## जीबीएसच्या पार्श्वभूमीवर मनपा सतर्क

जिल्हा प्रयोगशाळेकडे पाठविण्यात यावे. पाणी नमुने ओटी टेस्ट अल्प अथवा निरंक आढळल्यास त्वरित वरिष्ठांच्या निर्दशनास आणून द्यावेत. तसेच मनपा साथरोग विभागाकडून डायरिया, टॉयफाईड, कावीळ अशा जलजन्य आजाराचा प्रादूर्भाव आढळलेल्या ठिकाणी पाण्याची ओटी तपासणी, पाण्याची सूक्ष्मजीवी व रासायनिक तपासणी करण्यासाठी नमुने घेऊन जिल्हा प्रयोगशाळेकडे पाठवावेत, असे डॉ. राजूरकर यांनी म्हटले आहे.

## दर महिन्याला सादर करणार ताळेबंद

रक्कम जमा होते. तर, अधिकारी, कर्मचारी पगारावर ८.४८ कोटी, निवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शनवर ४.३० कोटी, शिक्षण मंडळ पगार ३० लाख, पाणीपुरवठा वीज बिल ३ कोटी, पथदिवे वीजबिल ४० लाख, कर्मचारी मानधन २५ लाख, दिव्यांग मानधन २० लाख, कुष्ठरुग्ण मानधन २ लाख, पेट्रोल व डिझेल ७ लाख, नगरसेवक मानधन (थकीत) ८ लाख, मोबाईल, फोन बिल, झेरॉक्स, अग्रीम, वाहन खर्च ६ लाख, पाणीपुरवठा दुरुस्ती व औषधे १५ लाख, आऊटसोर्सिंग कर्मचारी ३० लाख, अशुद्ध पाणी आकार २० लाख, कोर्ट केसेस १० लाख, पुरवठादार व विकास कामे तातडीची देयके ५० लाख, टँकर, बससेवा व जनावरे पकडणे ३५ लाख, कर्मचारी वेतन आयोग फरक २० लाख, असा दरमहा १८.९६ कोटींचा खर्च होत आहे. जमा व खर्चात २.६१ कोटींची दरमहा तूट निर्माण होत आहे. त्यामुळे आर्थिक अडचण निर्माण होत असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी निदर्शनास आणले आहे. महापालिका कार्यक्षेत्रात राज्य व केंद्र शासनाच्या निधीतून पाणीपुरवठा योजना, मल:निस्सारण योजना, सोलर प्रकल्प यासह कोट्यवधी रुपयांची रस्त्यांची कामे सुरू आहेत. यामध्ये महापालिकेला ३० टक्के स्वहिस्सा भरावा लागत आहे. त्यासाठी लागणारा निधी हा विकास भार (२५ टक्के रक्कम), अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक प्रीमियम, बांधकाम परवाना शुल्क व अशा इतर उत्पन्नातून भरण्याचा प्रयत्न महापालिका करत आहे. सद्यस्थितीत महापालिकेला रस्त्यांच्या कामांसाठी, इतर योजना व प्रकल्पांसाठी सुमारे ७० ते ८० कोटी रुपयांचा स्वहिसा भरावा लागणार आहे. त्यामुळे महापालिका उत्पन्न वाढीसाठी उपाययोजना करत आहे. नागरिक व मालमत्ताधारकांसमोर महापालिकेची आर्थिक स्थिती आम्ही मांडत आहोत. त्यामुळे खर्चातील तूट भरून काढण्यासाठी, नागरी सेवा, सुविधा सुरळीत राहाव्यात, यासाठी कराची वसुली वाढणे गरजेचे आहे. नागरिकांनी, थकबाकीदार मालमत्ता धारकांनी शास्तीमध्ये दिलेल्या १०० टक्के सवलतीचा लाभ घेऊन थकीत कराचा तत्काळ भरणा करावा व जप्तीची कारवाई टाळावी, असे आवाहन डांगे यांनी केले आहे.

## सुरेश चिपाडे यांचे निधन



**समाचार/नगर-दि.५**

माळीवाडा गोंधळे गल्ली येथील रहिवासी सुरेश किसन चिपाडे (चेअरमन, वय : ५०) यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर अंत्यसंस्कार नालेगाव अमरधाम येथे करण्यात आले. त्यांच्यामागे वडील, २ भाऊ, भावजया, चुलते, पुतणे असा परिवार आहे. ते मार्केट यार्ड येथील भाजी विक्रेते होत.

## कचरा वेचक दोन महिलांवर कॉटेज कॉर्नर येथे हल्ला

**समाचार/नगर-दि.५**

कचरा वेचक दोन महिलांना लोखंडी रॉडने मारहाण करून जीवेघेणा हल्ला करण्यात आला. ही घटना मंगळवारी (दि.४) सकाळी ८ च्या सुमारास नगर-मनमाड रस्त्यावरील कॉटेज कॉर्नर परिसरात घडली. या मारहाणीत दोन्ही महिला जखमी झाल्या आहेत.

मारहाणीत जखमी झालेल्या दोन्ही महिला या सिध्दार्थनगर येथील आहेत. याप्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. ४ रोजी सकाळी आठ वाजता फिर्यादी व त्यांच्या शेजारी राहणारी महिला, अशा दोघी कॉटेज कॉर्नर येथे कचरा वेचक काम करण्यासाठी गेल्या होत्या. तेथे अल्ताफ शेख याने त्याचे दुकान आम्हीच जाळले असल्याचा संशय घेऊन फिर्यादीला लोखंडी रॉडने मारहाण करून दुखापत केली. त्याने फिर्यादी व फिर्यादीसोबत असलेल्या महिलेस शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच फिर्यादी यांच्यासोबत असलेल्या महिलेसही लोखंडी रॉडने मारहाण केली, असे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोलिस करीत आहेत.

### धनेश बोगावत यांचा विशेष सन्मान

## ओ.पी.नय्यर हिटसमध्ये नगरकर मंत्रमुग्ध

**समाचार/नगर-दि.५**

हिंदी चित्रपट सृष्टीतील ख्यातनाम संगीतकार ओ. पी. नय्यर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित ओ. पी. नय्यर हिटस् दिल की आवाज भी सुन हा हिंदी चित्रपट गीतांचा कार्यक्रम नुकताच माऊली सभागृहात दिमाखात संपन्न झाला.

अहिल्यानगर मधील अनाहत एक कलासृष्टी या संस्थेतर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला माऊली सभागृहाला दहा वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सभागृह व्यवस्थापनाच्या वतीने रंगमंच, नटराज, पडदा, आणि ध्वनीक्षेपक यांचे पूजन करण्यात आले.

महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम प्रांत संघचालक नानासाहेब जाधव, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, अनिल बोरूडे, धनेश बोगावत, विलास बडवे, सुफी गायक पवन नाईक, अभिनेते मोहनीराज गटणे, रविंद्र बारस्कर आदी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि नटराज पूजन करून



मैफलीला सुरुवात करण्यात आली. या मैफलीत ओ. पी. नय्यर यांनी संगीतबद्ध केलेली एकापेक्षा एक अशी अवीट गाणी सादर करण्यात आली.

या कार्यक्रमात अनाहत च्या वतीने अहिल्यानगरीचे खऱ्याअर्थाने रसिकराज असलेले कलाकारांना नेहमीच शाबासकीची आणि कौतुकाची थाप देणारे, आपल्या खुमासदार शैलीतून आदरातिथ्य करणारे असे सुरांचा सांगाती धनेश बोगावत यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम प्रांत संघचालक नानासाहेब जाधव यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

# भाजपाच्या सदस्य नोंदणी अभियानात सहभागी व्हा - गंधे

**समाचार/नगर-दि.५**

गेल्या १० वर्षापासून भारतीय जनता पार्टी देशाच्या सर्वांगीण विकासासाठी बहुमोल योगदान देत आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारतास पूर्ण जगात मोठी प्रतिष्ठा मिळवून देण्याबरोबरच देशाची ताकदही वाढवली आहे. तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही राज्याची धुरा सक्षमपणे सांभाळत राज्याला वेगाने प्रगतीकडे नेण्यासाठी काम करत आहेत. भारतीय जनता पक्षाच्या राष्टहिताच्या विचारानेच आज देशात व राज्यात काम सुरु आहे. भारतीय जनता पक्षाच्या या कार्यात सर्व नागरिकांनी सहभागी होत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हात अजून बळकट करावेत. यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी भारतीय जनता पार्टीचे सदस्य व्हावे, असे आवाहन आहिल्यानगर सदस्य नोंदणी प्रमुख महेंद्र गंधे यांनी केले आहे.



भारतीय जनता पार्टीचे सध्या पूर्ण राज्यात सदस्य नोंदणी अभियान सुरु आहे. या अभियानास प्रदेशाध्यक्ष व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी १९ फेब्रुवारी पर्यंत मुदत वाढ दिली आहे. त्यानुसार शहर भारतीय जनता पार्टीच्या वतीने सदस्य नोंदणी प्रमुख महेंद्र गंधे शहराच्या विविध भागांमध्ये सदस्यता नोंदणी अभियान राबवत आहेत.

सर्व नागरिक भारतीय जनता पार्टीचे सदस्य होवू शकतात. भाजपाचे मोफत सदस्य होण्यासाठी व केंद्र व राज्य सरकारच्या सर्व योजनांची माहिती करुन घेण्यासाठी आपल्या मोबाईलवरून ८८०००२०२४ या मोबाईल नंबरवर फक्त मिस्ड कॉल द्यायचा आहे. त्यानंतर मेसेज मध्ये आलेल्या लिंकवर क्लिक करून स्वतःची माहिती भरून शेवटी रेफरन्स कोड च्या ठिकाणी RKZIMI हा कोड टाकून फॅार्म पूर्ण करावा व जगातील सर्वात मोठ्या पक्षाचे सदस्य होण्याचा बहुमान मिळवावा. अधिक माहितीसाठी ९६७३००३०५० ह्या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन महेंद्र गंधे यांनी केले आहे.

### दहावी, बारावी परीक्षेच्या पार्श्वभूमीवर निर्देश

# कॉपीमुक्त अभियान यशस्वी करण्याचे मुख्य सचिवांचे आवाहन

**मुंबई, दि. ४** - राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२५ ची उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. बारावी) परीक्षा दि. ११ फेब्रुवारी ते दि. १८ मार्च २०२५ आणि माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. दहावी) परीक्षा दि. २१ फेब्रुवारी ते दि. १% मार्च २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर कॉपी प्रकरणास पूर्णतः प्रतिबंध करण्यासाठी राज्यभर कॉपीमुक्त अभियान यशस्वी करण्याचे आवाहन मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसांच्या कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी बारावी आणि दहावीच्या परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त आणि निकोप वातावरणामध्ये सुरळीत पार पडाव्यात यासाठी शालेय शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने प्रयत्न करण्याचे निर्देश दिले होते. या पार्श्वभूमीवर मुख्य सचिव श्रीमती सौनिक यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत यासंदर्भात आढावा घेतला. शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल यावेळी उपस्थित होते. तर शालेय शिक्षण आयुक्त, राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, सर्व पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले.

मुख्य सचिव यांनी दिलेल्या निर्देशानुसार शिक्षणमंडळामार्फत राज्यातील संवेदनशील परीक्षा केंद्र परिसरामध्ये जिल्हा प्रशासनामार्फत ड्रोन कॅमेराद्वारे परीक्षा केंद्राची निगराणी करण्यात येईल. परीक्षा सुरू होण्याच्या एक दिवस आधी परीक्षा केंद्रावर आवश्यक भौतिक सुविधा सुव्यवस्थित आहेत का ? याची जिल्हा प्रशासनाकडून खात्री केली जाईल. परीक्षा केंद्राच्या बाहेर जिल्हा प्रशासनामार्फत व्हिडीओ चित्रीकरण करण्यात येईल. जिल्ह्यातील सर्व विभागांचे शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या साहाय्याने कॉपीमुक्त परीक्षा होण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रांवर भरारी पथके व बैठी पथके उपलब्ध होतील याचे नियोजन करण्यात येणार आहे.

# अहिल्यानगर नामांतर याचिकेत प्रशासनाने सक्षम भूमिका घ्यावी- आ. जगताप

**समाचार/नगर-दि.५**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्म गाव असलेल्या जिल्ह्याला अहिल्यानगर नाव देण्यात आले असून याबाबत शासन आदेश पारित झाला असून प्रशासकीय पातळीवर नामांतर करण्यात आले आहे. सकल हिंदू समाजाने या नामांतराबाबत उत्स्फुर्त स्वागत केले आहे. मात्र काही लोकांनी नामांतराबाबत उच्च न्यायालयात दावा दाखल केला असून या दाव्यात जिल्हा प्रशासनाने सक्षमपणे भूमिका घ्यावी, अशी मागणी करत याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांना आमदार संग्राम जगताप यांनी दिले.



यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वधुवर सुचक मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र तागड, माजी नगरसेवक काका शेळके, निशांत दातीर, इंजि.राजेंद्र पाचे, ऋषि ढवन, प्रथमेश तागड, संतोष गावडे, सचिन चितळकर, बाळासाहेब शिपनकर, महादेव ढाकणे, राहूल आडसूळे, तुषार यादव, विलास मोडवे, वैभव वाघ, विजय शिपनकर, संतोष तागड, रविंद्र गावडे, मयुर ढगे, संग्राम शेळके, अर्थव औटी, रवी राऊत, प्रविण पवार, कृष्णा टपले आदी मान्यवर उपस्थित होते.अहिल्यानगर नामांतराचा सकल हिंदू समाजाने स्विकार केला आहे. मात्र नामांतर विरोधात उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली असून खंडपीठाने नाशिक व अहिल्यानगर महापालिकेला आपली भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देष दिले आहे. या जनहित याचिकेतील आक्षेपांना जिल्हा प्रशासनाने सक्षमपणे प्रतिउत्तर देणे अवश्यक आहे. स्थानिक जनतेची भावना आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेवुन प्रशासनाने जिल्ह्याचे नामांतर अहिल्यानगर कायम रहावे, यासाठी न्यायालयात सकारात्मक भूमिका घ्यावी, असे निवेदनात नमुद केले आहे.

## बाबासाहेब उधार यांचे निधन

**समाचार/नगर-दि.५**

नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथील बाबासाहेब रघुनाथ उधार यांचे हदयविकाराच्या तीव्र झटक्याने नुकतेच निधन झाले .ते ४० वर्षाचे होते. ते मनमिळाऊ व शांत स्वभावाचे होते. सामाजिक कार्यात ते नेहमी अग्रेसर होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, एक भाऊ, तीन बहिणी, असा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे ग्रामस्थांनी व्यवहार बंद ठेवून त्यांना श्रद्धांजली वाहिली. त्यांचा निमगाव वाघा येथील अमरधाम येथे अंत्यविधी करण्यात आला.



## मुंबई शेअर भाव

**रोखीच्या गटात प्रचंड मागणी**
**वायदा गटात नाममात्र घट**

(शेअर सबब्रोकर)
अशोक पटवा
फोन-२४५२५२७, २४५२२६४
मोबा. ८७८८६९९९६१
**दिनांक ५-०१-२०२५**
**दुपारी २ पर्यंतचे भाव**

| | |
|---|---|
| आजचा इंडेक्स : | ७८३७५ |
| एसीसी | २०५८-५९ |
| एशियन पेंट | २२८९-९० |
| बजाज ऑटो लि. | ८९२२-२३ |
| बलराम फूड चिनी | ४७१-७२ |
| भारत फोर्ज | ११५८-५९ |
| क्रॉम्प्टन | ३६५-६६ |
| डीएलएफ | ७६५-६६ |
| डॉ. रेड्डीज् लॅब | १२२७-२८ |
| ग्रॅफाईट इंडिया | ४९९-५०० |
| हिंदुस्थान युनिलिव्हर | २४०८-०९ |
| आयटीसी लि. | ४४६-४७ |
| एल ॲण्ड टी लि. | ३४०९-१० |
| रिलायन्स इंड. | १२८२-८३ |
| एसबीआय | ७७०-७१ |
| टाटा मोटर्स | ७१६-१७ |
| टाटा स्टील | १३४-३५ |
| टीसीएस | ४०८०-८१ |
| लक्ष्मी ऑरगॅनिक | २२३-२४ |
| सुवेन फार्मा | ११२४-२५ |

# डॉ.पाऊलबुधे तंत्रनिकेतनचे स्नेहसंमेलन उत्साहात

**समाचार/नगर-दि.५**

सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे डॉ.ना.ज.पाऊलबुधे तंत्रनिकेतन महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण व स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाला.




नारायणडोह येथे झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे तांत्रिक सल्लागार संजय पवार, संकुलाच्या प्रमुख डॉ.रेखाराणी खुराणा, उपाध्यक्ष रामभाऊ बुचकुल, सचिव रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे, बी फार्मसी चे प्राचार्य डॉ. श्याम पंगा, डी फार्मसीचे प्राचार्या अनुराधा चव्हाण, डॉ. वेणु कोला, प्राचार्य संदिप कांबळे, प्राचार्य भरत बिडवे, तंत्रनिकेतन कॉलेजचे प्राचार्य बाळासाहेब बोर्डे उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी मनोरंजक, सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. यामधे पंजाबी लोकगीत, विविध नाटिका, नृत्य, गाणी ऐकत उपस्थितांनी दाद दिली. प्रास्तविकात प्राचार्य बाळासाहेब बोर्डे यांनी सांगितले की विद्यार्थ्यांनी कला, क्रिडा, स्पर्धा परीक्षेत मिळविलेल्या यशाचा आढावा घेतला. कला गुणांना वाव मिळण्यासाठी मनोरंजना बरोबरच क्रिडा स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये कबड्डी,खो-खो, हॉलीबॉल, क्रिकेट व सांधिक खेळांच्या स्पर्धा घेण्यात आली यामधील विजेत्या स्पर्धकांना बक्षीसे देण्यात येणार आहे. प्रमुख पाहुणे संजय पवार यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करून सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. स्नेहसंमेलन वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल लावण्यात आले होते या स्पर्धेत विद्यार्थिनींनी मोठ्या प्रमाणावर बक्षीसे जिंकली.

# महिलांच्या कॉमन समस्या व प्रभावी होमिओपॅथी उपचार



बऱ्याच स्त्रिया व मुलींना मासिक पाळीच्या वेळी जास्त प्रमाणात किंवा जास्त दिवस रक्तस्त्राव होतो. याचे सर्वसाधारण कारण म्हणजे बिघडलेले मानसिक स्वास्थ्य, सभोवतालची बदललेली परिस्थिती, वाढते ताणतणाव, काळजी असंतुष्ट वैवाहिक; तसेच लैंगीक जीवन, अतिश्रम अशा गोष्टींचा परिणाम मनःशांतीवर व पर्यायाने मासिक पाळीवर होतो. याव्यतिरिक्त निमिआ, संप्रेरके निर्माण करणाऱ्या आंतःस्त्रावी ग्रंथीचे (एन्डोक्राइन) आजार, गर्भाशयात अथवा अंडाशयात होणाऱ्या साध्या किंवा कर्करोगाच्या गाठी (फायबर्स, ट्यूमर्स, सिस्टस्, पॉलिप्स), प्रजनन संस्थेचा जंतुसंसर्ग इत्यादी कारणेही असु शकतात.

मासिक पाळीच्या या समस्येवर गुणकारी ठरणारी अनेक औषधे होमिओपॅथीत आहेत. कॅल्केरिआ कार्ब (calc-carb) स्थूल व उज्वल वर्णाच्या ज्या स्त्रिया मानसिक व आर्थिक आधारासाठी आपल्या जवळच्या व्यक्तीवर; तसेच नोकरीवर सर्वस्वीपणे अवलंबून असतात आणि या आधाराला धक्का लागला किंवा हिंसाचाराच्या अथवा दुःखद घटना ऐकण्यात आल्या, तर असुरक्षित वाटून त्यांची पाळी लगेच सुरू होतो त्यावेळी या औषधाचा उपयोग होतो. एरवीही पाळी लवकर येणे, रक्तस्त्राव जास्त दिवस व जास्त प्रमाणात होणे, पाळीच्या आधी डोके दुखणे, स्तन सुजून दुखरे होणे, पांढरा स्त्राव जाणे, लघवीच्या जागी खाज सुटून आग होणे, पाळीमध्ये पोट दुखणे, चक्कर येणे, पाय गार पडणे अशा तक्रारीमध्ये याचा उपयोग होतो. गर्भाशयाला आतून मोड येणे (पॉलिप), पिट्युटरी व थायरॉईड ग्रंथीचे कार्य बिघडणे, घाम जास्त प्रमाणात – विशेषतः डोक्याला घाम येणे, त्याला आंबूस वास येणे, वरचेवर सर्दी होणे, थोड्या श्रमांनी थकवा जाणवणे अशी लक्षणे असतील तर हे औषध गुणकारी ठरते.

सबिना (Sabina)– गर्भाशय शिथिल असते. पाळी लवकर येते. अंगावरून भरपुर प्रमाणात लालभडक रंगाचे गाठीमिश्रित पातळ रक्त जाते. जराशा हालचालीने स्त्राव वाढतो, पाळीच्या वेदना माकडहाड ते भगास्थी किंवा उलट्या दिशेने, ओटीपोट ते मांड्या अथवा योनी मार्गातुन वरच्या दिशेने होतात. गरम शेक घेतल्याने चांगले वाटते. दोन पाळीमध्येही लैंगिक उत्तेजनामुळे रक्तस्त्राव होऊ शकतो. उष्ण प्रकृतीच्या या स्त्रियांमध्ये संधिवातही आढळतो. यांना लिंबू सरनत विशेष आवडते.

थॅलस्पी बर्सा पॅस्टोरिस (Thlaspi bursa-Pastoris) क्रुसिफेरी कुळातील हे वनस्पती ओषध गर्भशयातव्या गाठींवर (फायब्रॉइड) अतिशय गुणकारी आहे. या स्त्रिया एका पाळीतून सावरतात तोच दुसरी पाळी पाळी सुरू सुरू होते. रक्तस्त्राव जास्त प्रमाणात गाठीमिश्रित असुन, तो होताना ओटीपोटात खूप वेदना होतात. एकाआड एक पाळीला जास्त त्रास होतो. भराभर हालचाल केल्याने बरे वाटते. कपड्यांना पडलेले रक्ताचे डाग धुतल्यावरही पूर्णपणे जात नाहीत, यांना खूप लांब चालायला आवडते. पेयांमध्ये ताक विशेष आवडते.

मक्युरिअस (Mercurius) पाळीच्या वेळी अधिक रक्तस्त्राव होणे, पोटात दुखणे, पाळी सुरू होताना चक्कर येणे, स्तनांमध्ये दुध साठून ते दुखुन फुगीर होणे, अंगावर कुठेही गळवे येणे व पाळी संपल्यावर ती आपोआप बसणे, घामाचे व लाळेचे प्रमाण जास्त असणे, तोंड येणे, हिरड्यांतून सहज रक्त येणे, दात लवकर किडणे अशी लक्षणे असल्यास या ओषधाने गुण येतो. स्तनांचा अथवा गर्भाशयाचा कर्करोग, गर्भाशय बाहेर येणे यावरही गुणकारी.

सिमिसिफ्युगा (Cimicifuga racemosa) हळव्या व नाजुक मनोवृत्तीच्या स्त्रिया काळजी, भीती, नातेसंबंधातील अथवा व्यवसायातील अपेक्षाभंग, अतिश्रम यामुळे निराश, दुःखी काष्टी होतात. परिणामी मासिक पाळी अनियमित होते. गर्भाशय शिथिल होते. अंगावरून गोठलेले गडद रंगाचे दुर्गंधीयुक्त रक्त जाते. त्याचे प्रमाणही कमी जास्त असते : परंतु रक्तत्राव जास्त असेल, तर वेदनाही जास्त होतात. या वेदना खालच्या पोटात एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे अथवा तिथुन वरच्या किंवा खालच्या मांडीच्या दिशेने अशा फिरत्या असतात. अशा वेळी हे औषध गुणकारी ठरते. पाळीच्या वेळी पाठदुखी, कंबरदुखीचाही त्रास होणे, दुखऱ्या भागाला गुंडाळून ऊब दिल्याने, दाबल्याने बरे वाटते, पायांमध्ये जडपणा जाणवणे, पाळीच्या वेळी फेफरे भरणे अशा लक्ष्यणांमध्येही गुणकारी. अमोनिअम कार्बोनिकम (-mmonium carb) पाळी लवकर येणे, रक्तस्त्राव जास्त प्रमाणात काळपट रंगाचा, गुठळ्या मिश्रित असणे, पोट दुखणे, पोटावर झोपल्यास बरे वाटणे, पाळीच्या वेळी सर्वांगातील जोर गेल्यासारखा वाटणे, जांभया येणे, थंडी वाजणे, ताप येणे, सर्दी होणे, येणे. चेहयावर पुटकुळ्या येणे, पोट बिघडून, मळमळ, जुलाब, बुद्धकोष्ठता, रक्तस्त्राव रात्रीच्या वेळी अधिक होणे, त्यानंतर धाप लागणे व अशक्तपणा जाणवणे अशी लक्षणे दिसणे असे त्रास असल्यास या औषधाचा उपयोग होतो. या व्यतिरिक्त लक्षण साधर्म्यावरून मॅग-फॉस (mag-Phos), नेट्रम-म्युर (Nat-mur) ऱ्हस- टॉक्स (Rhus-Tox), एरिजेरॉन (रीसळपळर्पीप) सेनेशिओ (शिपशलळे) फॉस्फरस (Phosphorus). इत्यादी औषधेही गुणकारी ठरतात.

**(टीप : – वर सुचविलेली औषधे होमिओपॅथी तज्ञांच्या सल्ल्यानुसार घ्यावीत.)**

– **डॉ. प्रतिमा बोरा** होमिओपॅथी तज्ज्ञ
डॉ. बोरा होमिओपॅथी क्लिनिक, चाणक्य चौक, अहिल्यानगर

# ‘आडसूळ’च्या विद्यार्थ्यांना मिळाली नोकरीची संधी

**समाचार/नगर-दि.५**

चास येथील आडसूळ टेक्निकल कॅम्पसचे प्राचार्य डॉ. प्रदीप पाटील यांनी पदभार स्वीकारल्यापासून विविध नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या प्लेसमेंट ड्राईव्ह मध्ये विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या. नगर जिल्ह्यातील सर्व अभियांत्रिकी पदविका(डिप्लोमा) व अभियांत्रिकी पदवीच्या(डिग्री) संगणक विभागातील तृतीय व अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांकरिता आरोही सॉफ्टवेअर, -२न आयटी हब, आणि शोरट इंनोव्हेशन प्रा. लि. कंपनीसह पुणे व अहिल्यानगर मधील बहुराष्ट्रीय कंपन्यांचा कॅम्पस इंटरव्यू १ फेबुवारी रोजी आयोजित करण्यात आलेला होता. त्यामध्ये ५० विद्यार्थ्यांनी रजिस्ट्रेशन केले व ४० विद्यार्थी प्रत्यक्ष मुलाखतीसाठी सहभागी झाले होते, त्यापैकी ८ मुलांची निवड झाली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांपैकी काही विद्यार्थ्यांना मुलाखतीनंतर ऑफर लेटर देण्यात आले व उरलेल्या विद्यार्थ्यांना टेक्निकल राऊंडसाठी कंपनीमध्ये बोलवण्यात आलेले आहे.

यावेळी आरोही सॉफ्टवेअरचे को फॉउंडेर योगेश मांडे यांनी विद्यार्थ्यांना मुलाखतीसाठी काय तयारी केली पाहिजे व मुलाखतीस कसे सामोरे गेले पाहिजे यावर मार्गदर्शन केले. आडसूळ शैक्षणिक संकुलाचे प्लेसमेंट अधिकारीदिगंबर पवार यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी कोणकोणती कौशल्य विकसित करावी याविषयी सखोल मार्गदर्शन केले.

संस्थेचे अध्यक्ष अनिरुद्ध आडसूळ यांनी संस्थेतील व आजूबाजूच्या परिसरातील सर्व शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मदत व्हावी हाच मानस असल्याचे सांगितले.

संस्थेचे अध्यक्ष अनिरुद्ध आडसूळ, सचिव लिना आडसूळ, मा खजिनदार परमेश्वर आडसूळ, डायरेक्टर कृष्णा आडसूळ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रदीप एम. पाटील, डीन अकॅडेमिक डॉ. हेमंत जाधव आडसूळ तंत्रनिकेतनचे प्राचार्य गडाख आर एस , इलेक्ट्रॉनिक विभाग प्रमुख डॉ.दिनेश अडोकर, संगणक विभाग प्रमुख डॉ.खान, सिव्हिल विभाग प्रमुख प्रा. डौले ए.डी, एम.बी.ए विभाग प्रमुख डॉ.विश्वजित कांबळे, मेकॅनिकल विभाग प्रमुख प्रा. जावरे ए. आर. यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

रोख रकमेसह ८ तोळे दागिने चोरीस

# वसंत टेकडी परिसरात वृध्द दाम्पत्याचे घर फोडले

**समाचार/नगर-दि.५**

सावेडी उपनगरातील शिलाविहार, वसंत टेकडी परिसरात राहणाऱ्या वृध्द दाम्पत्याचे घर फोडून सुमारे आठ तोळ्याचे सोन्याचे दागिने व २० हजाराची रोकड, असा ऐवज लंपास केला आहे. या प्रकरणी सुष्मा किरण अहलुवालिया (वय ५९) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २२ जानेवारी सकाळी ९ वाजता फिर्यादी आणि त्यांचे पती लग्नासाठी मुंबईला गेले होते. घर सोडण्यापूर्वी त्यांनी सर्व दरवाजे व्यवस्थित बंद करून कुलूप लावले. २६ जानेवारी रोजी फिर्यादी यांचे पती घरी परतले, मात्र त्यांनी कपाट पाहिले नव्हते. ३१ जानेवारी रोजी सकाळी ९:३० वाजता फिर्यादी घरी परतल्या असता त्यांना घरातील कपाट उघडे असल्याचे दिसले. आतील तिजोरीचे लॉक तुटलेले होते आणि त्यातील मौल्यवान वस्तू व रोख रक्कम गायब होती. त्यांनी पतीला विचारले असता, त्यांनी कपाटाकडे लक्ष दिले नसल्याचे सांगितले. त्यामुळे घरात चोरी झाल्याचा त्यांना संशय आला. तोफखाना पोलिसांना माहिती देताच त्यांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली आणि त्यानंतर फिर्याद नोंदविण्यात आली. २० हजाराची रोकड, सहा तोळ्याचा सोन्याचा राणीहार, एक तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र, एक तोळ्याच्या सोन्याच्या कानातील तीन जोड रिंग असा ऐवज चोरीला गेला असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

## आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत सोहम वाघस्कर प्रथम



**समाचार/नगर-दि.५**

जैनाचार्य श्री शिवमुनीजी गुरुकुल (जेएसएस) स्कूलचा विद्यार्थी सोहम अशोक वाघस्कर याने रोटरी मिडटाऊन करंडक आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल त्याचा शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला. स्कूलचे प्राचार्य आनंद कटारिया यांनी वाघस्कर याचा सत्कार केला. याप्रसंगी शालेय शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आनंद कटारिया म्हणाले की, विद्यार्थ्यांना शाळेत फक्त पुस्तकी ज्ञान न देता, त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने उपक्रम राबविले जात आहे. विद्यार्थ्याला ज्या क्षेत्राची आवड आहे, ती आवड ओळखून त्याला योग्य मार्गदर्शन करुन स्पर्धेत उतरविण्यात येत आहे. शाळेचे योग्य मार्गदर्शन व प्रोत्साहनामुळे विद्यार्थी विविध स्पर्धेत चमकत असल्याचे त्यांनी सांगितले.

नुकतीच शहरात रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर मिडटाऊनच्या वतीने आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा उत्साहात पार पडली. यामध्ये मोठ्या संख्येने शहरातील शालेय विद्यार्थ्यांचा सहभाग लाभला होता. या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविल्याबद्दल वाघस्कर याला गोल्डन माईक पारितोषिक स्वरुपात प्रदान करण्यात आले. तो जेएसएस स्कूलचा इयत्ता ५ वीचा विद्यार्थी आहे. या स्पर्धेसाठी त्याला त्याच्या आईने विशेष मार्गदर्शन केले.

# ‘अरिहंत’मधील रक्तदान शिबिरात विद्यार्थ्यांचा सहभाग

**समाचार/नगर-दि.५**

केडगाव येथील अरीहंत फार्मसी व केमिस्ट असोसिएशन ऑफ अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने माजी आमदार जगन्नाथ उर्फ आप्पासाहेब शिंदे यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त दि. २४ जानेवारी रोजी भव्य रक्तदान शिबीर घेण्यात आले. जगन्नाथ शिंदे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत ७५००० रक्तदात्यांचे रक्तदान हा संकल्प करण्यात आला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. योगेश बाफना यांनी स्वतः रक्तदान करून विद्यार्थ्यांना रक्तदानाचे महत्त्व सांगितले. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. योगेश बाफना यांच्या हस्ते झाले. रक्तदान हे श्रेष्ठ दान या



भावनेतून महाविद्यालयातील सर्वांनी या शिबिरात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. योगेश बाफना, उपप्राचार्य प्रा. वर्षाराणी आव्हाड, प्रा.पियुष जंगम, प्रा.भाग्यश्री रंधवान प्रा. स्नेहा कणसे, प्रा. स्वप्निल काळे, प्रा. तृप्ती शिंदे, प्रा. जितेश बत्रा प्रा. अश्विनी गुंजाळ, उपप्राचार्य प्रा. माधुरी पवार, प्रा. प्रतीक्षा गांधी, प्रा. वृषाली गायकवाड, प्रा.शितल खंडागळे, प्रा. रुचिता पवार ग्रंथपाल अपर्णा पंडित, योगेश पंडित, धनश्री गटणे, स्वाती भुजबळ, सोनी मिश्रा, पल्लवी गुगळे, नीलम म्हस्के, अमोल बर्डे, अनिल गावडे, बाळासाहेब भागवत, शारदा भागवत, अंजली काळे तसेच सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# तबला वादन परीक्षेत ओंकार चौकटे द्वितीय

**समाचार/नगर-दि.५**



अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळातर्फे सत्र नोव्हेंबर डिसेंबर २०२४ या सत्रात घेण्यात आलेल्या सांगीतिक परीक्षांचा निकाल नुकताच जाहीर झाला असून शिवरंजन संगीतालयाचा ओंकार निलेश चौकटे हा विद्यार्थी तबला वादन हा विषय घेऊन मध्यमा पूर्ण परीक्षेत केंद्रात द्वितीय आला.

चौकटे याला विद्यालयाचे संचालक सुरज शिंदे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. ओंकार हा पेमराज सारडा वाणिज्य शाखेचा द्वितीय वर्षाचा चा विद्यार्थी असून शिंदे मळा भागातील टेलर व्यावसायिक निलेश चौकटे यांचा मुलगा आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्म-त्रिशताब्दीनिमित्त चौंडीत राष्ट्रीय परिषद

# देशभरातील ४०० कर्तृत्ववान महिलांचा सहभाग; जेएनयुच्या कुलपती डॉ. शांतीश्री पंडित यांच्या हस्ते उद्घाटन

**पुणे, दि. ५-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जन्म वर्षानिमित्त चौंडी (जि.अहिल्यानगर) येथे राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या रविवारी ९ फेब्रुवारीला सकाळी १० ते सायंकाळी ५ यावेळेत होणाऱ्या परिषदेला देशभरातील ४०० कर्तृत्ववान महिलांचा सहभाग असेल, अशी माहिती महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थचे कार्याध्यक्ष रवींद्र देव यांनी दिली.




नवी पेठेतील श्रमिक पत्रकार संघात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. अहिल्यादेवी होळकर जन्म त्रिशताब्दी समारोह समितीचे प्रांत संयोजक महेशराव करपे यावेळी उपस्थित होते.

देव पुढे म्हणाले, २०२५ हे वर्ष पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्म त्रिशताब्दीचे वर्ष आहे. आहे. या निमित्ताने, त्यांचे जन्मगाव चौंडी येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन ‘लोकमाता अहिल्याबाई होलकर त्रिशताब्दी समारोह समिति’द्वारे करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या (नवी दिल्ली) कुलपती डॉ. श्रीमती शांतीश्री पंडित यांच्या हस्ते होणार आहे. समारोप सत्रात ‘लोकमाता अहिल्याबाई होळकर त्रिशताब्दी समारोह समिती’च्या सचिव कॅप्टन श्रीमती मीरा दवे संबोधित करणार आहेत. महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था या कार्यक्रमाची सह-आयोजक असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी महेशराव करपे म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांना अभिवादन आणि राष्ट्रहितार्थ वैचारिक मंथन हे या कार्यक्रमाचे स्वरूप असणार आहे. कार्यक्रमात अहिल्यादेवींच्या लोककल्याणकारी सुशासनावर चिन्मयी मुळे, धार्मिक कार्य व राष्ट्रीय दृष्टीकोन या विषयावर डॉ.मालती ठाकूर, अहिल्यादेवींच्या स्थापत्यशास्त्रावर डॉ. उज्वला चक्रदेव, सामाजिक सुधारणांवर डॉ. आदिती पासवान आणि महिला सबलीकरण या विषयवार नयना सहस्त्रबुद्धे यांचा परिसंवाद होणार आहे. तसेच विविध विषयांवर यावेळी गटचर्चा, नृत्यनाटीका, अहिल्यादेवींच्या कार्याविषयी प्रदर्शनीचे आयोजन याप्रसंगी करण्यात आले आहे. उपस्थितांमध्ये प्रशासकीय, धार्मिक, उद्योग, अभ्यासक, सामाजिक कार्यकर्त्या अशा विविध क्षेत्रात प्रतिनिधित्व करणाऱ्या महिलांचा सहभाग असणार आहे. या दिवसभराच्या कार्यक्रमात सांस्कृतिक कार्यक्रमही होणार आहे. त्यात देशभरातील मान्यवर महिलांचा सहभाग असणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या चरित्रापासून प्रेरणा घेऊन विविध भौगोलिक व सामाजिक क्षेत्रांत विधायक कामांची आखणी व उभारणी करणे, हा या उपक्रमाचा हेतू आहे.

## राजे उमाजी नाईक यांना अभिवादन

**पुणे, दि. ५-** आद्य क्रांतीकारक राजे उमाजी नाईक यांच्या ९३व्या पुण्यतिथीनिमित्त स्वारगेट येथील हुतात्मा स्मारक येथे अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, इतिहासप्रेमी मंडळाचे अध्यक्ष प्रा.मोहन शेटे, माजी खासदार प्रदीप रावत, जेजुरी देवस्थानचे विश्वस्त पोपट खोमणे, सहाय्यक पोलीस आयुक्त अनुजा देशमाने, पोलीस निरीक्षक शशिकांत चव्हाण, अप्पासाहेब चव्हाण, भुपेंद्र मुजुमदार उपस्थित होते.

राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळासाठी निधीची तरतूद याविषयी मुख्य मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करणार असल्याचे पाटील यांनी यावेळी बोलताना सांगितले.

कार्यक्रमाचे आयोजन राजे उमाजी नाईक हुतात्मा स्मारक आणि वात्सल्य ट्रस्ट यांनी केले. सूत्रसंचालन सुनील जाधव यांनी केले. उपस्थितांचे आभार संजय जाधव यांनी मानले.

# देवदेवेश्वर संस्थानतर्फे पुरस्कार प्रदान

**पुणे, दि. ५-** श्री देवदेवेश्वर संस्थान अंतर्गत सारसबाग मंदिरातील श्री सिद्धिविनायक देवतेच्या वार्षिक महोत्सवात श्रीमंत नानासाहेब पेशवे धार्मिक, अध्यात्मिक आणि सामाजिक पुरस्कार प्रदान करण्यात आले. यंदाचा पुरस्कार प.पू.भागवताचार्य शरदशात्री जोशी (पुणे) आणि प्रा.स्वानंद पुंड (वणी) यांना डॉ.कल्याणी नामजोशी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी संस्थानचे मुख्य विश्वस्त रमेश भार्गव, सुधीर पंडित, पुष्कर पेशवा, जगन्नाथ लडकत, आशिष कुलकर्णी आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रा.पुंड म्हणाले, पुराणकथांकडे पहाण्याचा दृष्टीकोन वेगळा असायला पाहिजे. त्या समजून घेण्याच्या कथा आहेत. अनंत कोटी ब्रह्मांड आत जे काही आहे, ते आपल्यात आहे. त्यामुळे या कथा आपल्यात पहायच्या आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रमेश भागवत यांनी केले. सुधीर पंडित यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दीनिमित्त अभिवादन सभा

**पुणे, दि. ५-** श्री देवदेवेश्वर संस्थान अंतर्गत सारसबाग मंदिरातील श्री सिद्धिविनायक देवतेच्या वार्षिक महोत्सवात श्रीमंत नानासाहेब पेशवे धार्मिक,




अध्यात्मिक आणि सामाजिक पुरस्कार प्रदान करण्यात आले. यंदाचा पुरस्कार प.पू.भागवताचार्य शरदशात्री जोशी (पुणे) आणि प्रा.स्वानंद पुंड (वणी) यांना डॉ. कल्याणी नामजोशी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी संस्थानचे मुख्य विश्वस्त रमेश भार्गव, सुधीर पंडित, पुष्कर पेशवा, जगन्नाथ लडकत, आशिष कुलकर्णी आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रा.पुंड म्हणाले, पुराणकथांकडे पहाण्याचा दृष्टीकोन वेगळा असायला पाहिजे. त्या समजून घेण्याच्या कथा आहेत. अनंत कोटी ब्रह्मांड आत जे काही आहे, ते आपल्यात आहे. त्यामुळे या कथा आपल्यात पहायच्या आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रमेश भागवत यांनी केले. सुधीर पंडित यांनी उपस्थितांचे आभार मानले.

खा. नीलेश लंके; दुधातील भेसळीसाठी कठोर उपाय करा

# ‘आयुष्मान’ खासगी रुग्णालयासाठी लाभदायी

**समाचार/पारनेर-दि.५**

इतर देशांच्या तुलनेत भारतातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अत्यंत दुर्बल आहे.आयुष्मान भारत सारख्या योजनांचा लाभ सर्वसामान्यांना होण्याऐवजी खासगी रुग्णालयांना होत असल्याचे चित्र देशात आहे.अर्थसंकल्पात सार्वजनिक आरोग्यासाठी अत्यल्प तरतूद करण्यात आली आहे.देशातील शेती आणि शेतकऱ्यांच्या विकासासाठी अर्थसंकल्पात कोणत्याही ठोस उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत.असे घणाघाती आरोप खासदार नीलेश लंके यांनी राष्ट्रपतींच्या



कोवीड सारख्या महामारीच्या पार्श्वभूमीवर,सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी अर्थसंकल्पात मोठ्या प्रमाणावर तरतूद करणे आवश्यक होते.पायाभूत सुविधांसाठी अधिक गुंतवणूक अपेक्षित होती.मात्र सर्वसामान्यांच्या जीवन मरणाशी निगडीत असलेल्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेकडे अर्थसंकल्पात दुर्लक्ष करण्यात आले असल्याचे खासदार लंके म्हणाले.

कॅन्सरच्या उपचारासाठी ४० ते ५० लाख रुपये तर यकृत बदलण्याच्या शस्त्रक्रियेसाठी २० ते २५ लाख रुपये खर्च येतो.या आणि अशा इतर गंभीर आजारांसाठी येणारा खर्च पंतप्रधान सहाय्यता निधी, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, महात्मा फुले जन आरोग्य योजनांच्या तुटपुंज्या रकमेतून भागवता येत नाही.त्यामुळे रुग्ण सहाय्यता निधीमध्ये भरीव वाढ करण्याची मागणी खासदार लंके यांनी केली.

**अर्धा, एक मिनिट द्या की ओ साहेब**

**राष्ट्रपती अभिभाषणावरील चर्चेसाठी खासदार नीलेश लंके् यांना दिलेली वेळ संपल्यावर पिठासीन अधिकारी कृष्णा प्रसाद तेन्नेटी यांनी दुसऱ्या सदस्याचे नाव पुकारले.त्यावेळी खासदार लंके यांनी, अध्यक्ष महोदय, अर्धा एक मिनिट द्या की ओ साहेब अशी विनंती केली.खासदार लंके यांची विनंती करण्याची ग्रामीण पध्दत पाहून पिठासीन अधिकारी तेन्नेटी यांना हसू आवरले नाही.**



# पोस्टल डिव्हीजन सोसायटीला राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

**समाचार/नगर-दि.५**

कोल्हापूर येथील अविज पब्लिकेशन वतीने देण्यात येणारा बँको पगारदार पतसंस्था पुरस्कार यावर्षी अहमदनगर पोस्टल डिव्हीजन को ऑप क्रेडीट सोसायटीला प्रदान करण्यात आला. दरवर्षी राज्यातील विविध सहकारी संस्थांना उल्लेखनीय कार्याद्दल हा पुरस्कार दिला जातो. यावर्षीचा पुरस्कार सोहळा नुकताच लोणावळा येथील ॲम्बेव्हॅली येथे आयोजित करण्यात आला होता.

हा पुरस्कार माजी सहकार आयुक्त चंद्रकांत दळवी यांच्या हस्ते संस्थेचे चेअमरमन रामेश्वर ढाकणे, संचालक निसार शेख, सलीम शेख व व्यवस्थापक नितीन वाघ यांनी स्विकारला.

यावेळी बैंकों मासिकाचे संपादक अविनाश गुंडाळे सह विविध संस्थाचे पदाधिकारी व अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या पुरस्काराकरीता संस्थेची आर्थिक स्थिती,सामाजिक कार्य, ऑडिट वर्ग, सभासदांच्या ठेवी व कर्ज, थकबाकीचे प्रमाण यासह २० निकषावर खरे उतरत संस्थेला हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



# आनंद योग केंद्रात जागतिक सूर्यनमस्कार दिन साजरा; साधकांचा मोठा सहभाग

**समाचार/नगर-दि.५**

सावेडी येथील आनंद योग केंद्राच्या वतीने जागतिक सूर्यनमस्कार दिन साजरा करण्यात आला. सावेडी येथील शुभ मंगल कार्यालयात पहाटे सहा वाजल्यापासून योग साधकांनी सूर्यनमस्कार घालण्यास सुरुवात केली. या उपक्रमास परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

आरोग्य निरोगी व सदृढ राहून जीवन आनंदी होण्यासाठी आनंद योग केंद्राच्या माध्यमातून नागरिकांना निशुल्क योग, प्राणायामाचे धडे दिले जातात. सर्वसामान्य नागरिकांमध्ये योग व प्राणायामाची आवड निर्माण होण्याच्या हेतूने जागतिक सूर्य नमस्कार दिन साजरा करण्यात आला. जागतिक सूर्यनमस्कार दिनानिमित्त घेण्यात आलेल्या या उपक्रमात दीडशेपेक्षा जास्त योग साधकांनी सहभाग नोंदविला. उपस्थितांना निरोगी आरोग्यासाठी सूर्यनमस्काराचे फायदे सांगण्यात आले. सकाळी १० वाजे पर्यंत योग साधकांचे सूर्यनमस्कार सुरु होते. आप आपल्या क्षमतेप्रमाणे साधकांनी ५१, १०१, १५१ सूर्य नमस्कार पूर्ण केले. या उपक्रमासाठी योग केंद्राचे केंद्रप्रमुख दिलीप कटारिया यांचे मार्गदर्शन लाभले.

जिजाऊ ब्रिगेडचा उपक्रम

# हळदी-कुंकू कार्यक्रमात महिलांचे आरोग्यावर प्रबोधन

**समाचार/नगर-दि.५**

अहिल्यानगरमध्ये जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष ॲड. स्वाती जाधव यांच्या वतीने पारंपरिक हळदी-कुंकू समारंभ अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. या सोहळ्यात केवळ सणाचा आनंदच नव्हे तर महिलांना आरोग्य, स्वसंरक्षण व कायदे याबाबत जागरूक करण्यावर भर देण्यात आला.

अध्यक्षस्थानी जिजाऊ ब्रिगेड प्रदेश कार्याध्यक्षा राजश्री शितोळे होत्या, तर प्रदेश सह संघटक डॉ. कल्पना ठुबे यांनी जिजाऊ वंदना सादर केली. सुरभी हॉस्पिटलच्या संचालिका डॉ. सुलभा पवार यांनी महिलांच्या आरोग्यासंदर्भात महत्त्वपूर्ण माहिती दिली तर क्रिमिनल लॉयर ॲभड. स्नेहा लोखंडे यांनी महिलांच्या हक्क आणि कायद्यांवर मार्गदर्शन केले. या वेळी जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने शहीद जवानांच्या पत्नी आणि एकल महिलांचा विशेष सन्मान करण्यात आला. स्त्रिया केवळ चूल-मूलापुरत्या मर्यादित न राहता यशाची वाटचाल करावी, असे ॲचड. स्वाती जाधव यांनी सांगितले. यावेळी रेशमा आठरे, माया जगताप, चंद्रकला कळमकर, अनिता काळे, प्राची कळमकर, करुना काळे, सुरेखा चेमटे, पजया भोकरे, उज्वला कळमकर, उर्मिला मुळे, डॉ. केवळ ज्योती पाटील, संगीता धामणे, अर्चना अनभुले, वर्षा दिपिका, स्वाती राजेभोसले, सुरेखाताई भोसले, नलिनी गायकवाड, भारती औटी, उर्मिला कदम, उषा काळे, ड .अनुराधा येवले, कविता दरंदले आदीसह इतर विविध क्षेत्रातील महिला उपस्थित होत्या.

# अध्यापक विद्यालयाची स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी; करंडक पटकावला

**समाचार/नगर-दि.५**

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या (संगमनेर) वतीने जिल्ह्यातील सर्व अध्यापक विद्यालयासाठी (डी.एल.एड.) जिल्हातर्गत क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ पारनेर क्रीडा संकुल येथे संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. राजेश बनकर होते. प्रमुख अतिथी म्हणून तालुका क्रीडा अधिकारी डाएटचे ज्येष्ठ अधिव्याख्याता लक्ष्मण सुपे तसेच अधव्यख्यता मुकूंद दहिफळे सांख्यिकी सहाय्यक नितीन टिळेकर आदी उपस्थित होते. उद्घाटन कार्यक्रमाचे नियोजन जामगाव अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य गोडे जी.के. व सूत्रसंचालन जामगाव अध्यापक विद्यालयाचे अध्यापकचार्य जाधव यांनी केले. प्रास्ताविक प्राचार्य शेटे यांनी केले.

अहमदनगर जिल्हांतर्गत अध्यापक विद्यालय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेमध्ये अ.ए. सोसायटीच्या अध्यापक विद्यालयातील छात्राध्यापकांनी घवघवीत यश संपादन केले. यामध्ये सांघिक व सांस्कृतिक प्रकारात विविध बक्षीसे पटाकवली. सर्व जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयामध्ये अ.ए. सोसायटी अध्यापक विद्यालयाने सर्व स्पर्धामध्ये चमकदार कामगिरी केल्यामुळे अध्यापक विद्यालयाच्या मुलींनी जनरल चॅम्पियनशीप फिरता करंडक मिळविला. यासाठी प्रेरणा प्राचार्य संदीप उबाळे सर यांनी दिली.

आनंद भाटे, विदुषी जोशी, कृष्णा बोंगाणे यांचे होणार शास्त्रीय गायन

# नगरमध्ये ११ पासून नगारा संगीत महोत्सव

**समाचार/नगर-दि.५**

नगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे, न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, नगर या महाविद्यालयातील संगीत विभागाच्यावतीने प्रतीवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या नगारा संगीत महोत्सवाचे आयोजन दि.११,१२ व १३ फेब्रुवारी रोजी करण्यात आले आहे.



मंगळवार, दि. ११ फेब्रुवारी रोजी सायं.६.०० वाजता महोत्सवाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे यांच्या हस्ते होईल. त्यानंतर राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त प्रसिद्ध गायक पं. आनंद भाटे यांची शास्त्रीय व सुगम गायनाची मैफल होणार आहे. त्यांना संवादिनीवर सुयोग कुंडलकर व तबल्यावर भरत कामत हे साथसंगत करणार आहेत. बुधवार, दि. १२ फेब्रुवारी रोजी सायं. ६.०० वाजता .उस्ताद राशिद खां यांचे पट्टशिष्य, प्रसिद्ध गायक पं. कृष्णा बोंगाणे व संगीतमार्तंड पं. जसराज यांच्या पट्टशिष्या, प्रसिद्ध गायिका विदुषी अंकिता जोशी यांची जसरंगी’ ही वैशिष्ट्यपूर्ण जुगलबंदीची शास्त्रीय मैफल आयोजित करण्यात आली आहे. त्यांना संवादिनीवर अभिनय रवंदे, अभिषेक शिनकर व तबल्यावर आशय कुलकर्णी व रामकृष्ण करंबेळकर हे साथसंगत करणार आहेत. सर्व कार्यक्रम महाविद्यालयातील राजर्षी शाहू महाराज सभागृह येथे होणार आहेत.

तसेच, दि. १३ फेब्रुवारी रोजी राज्यस्तरीय देशभक्तीपर समूहगीत गायन स्पर्धा महाविद्यालयातील राजर्षी शाहू सभागृह येथे व राज्यस्तरीय छोटाख्याल गायन स्पर्धा (वैयक्तिक) सेमिनार हॉल येथे सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत आयोजित करण्यात आली आहे. सायं. ५ वाजता संस्थेचे सेक्रेटरी ॲड.विश्वासराव आठरे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम विनामूल्य आहे.

# ‘वर्ल्ड फुनाकोशी’ च्या विद्यार्थ्यांचे परीक्षेत यश

**समाचार/नगर-दि.५**

कराटे या खेळामुळे विद्यार्थ्यांची मानसीकता अत्यंत सुदृढ बनते, कराटे मुळे बुध्दी तेज व तल्लख बनते, आपल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील वर्ल्ड फुनाकोशी शोतोकान कराटे या संस्थेच्या १८ विदयार्थ्यांना घवघवीत यश मिळाले आहे. कराटे परीक्षा अत्यंत कठीण असते, कराटे परीक्षा घेण्यासाठी १२ परीक्षकांची नेमणुक करण्यात आली होती. वर्ल्ड फुनाकोशी शोतोकान कराटे चे मुख्य प्रशिक्षक हारुण शेख यांनी सांगितले की, सदरचे विद्यार्थी हे फक्त कराटे खेळापुरतेच मर्यादीत नसुन ते लाठी काठी, नांचाकु, तसेच शारीरीक तसेच मानसिक दृष्ट्या देखील



तल्लख बनलेले आहे. कराटे ही एक निशस्त्र युध्द कला आहे. सध्याच्या काळात मुला मुलींना कराटेचे प्रशिक्षण घेणे अत्यंत गरजेचे आहे. परीक्षार्थी खालील प्रमाणे- यलो बेल्ट :- मिवान कर्नावट, आर्या पडागळे, माहिरा डोमे, समद शेख, मानस गुगळे, शीरीन शेख, स्नेहा मोढवे, आराध्या डोमे, सिध्दी टट्टु ऑरेंज बेल्ट :- संस्कृती गोरे, संस्कृती नरोटे. ब्लू बेल्ट : श्रीहरी इवले, दिशा पितळे, सोनाक्षी पितळे. पर्पल बेल्ट : आचल गुगळे. गोल्डन ब्राऊन बेल्ट :- सत्यम मुसमाडे, शिवम मुसमाडे, आशखान शहा. ब्लॅक बेल्ट :- मुस्फिरा शेख. ब्लॅक बेल्ट सेकन्ड हुँन पार्थ चतारे, आहाना भंडारी. कराटे परीक्षा पर्यवेक्षणासाठी ब्लॅक बेल्ट अदिती जाधव, सायली सुपेकर, महेक शेख, विद्धी गुंदेचा, शौर्य बल्लाळ, अदित्य बोरा, ऋऋषिकेश लालवाणी. प्रशिक्षक :- रमज़ान शेख, तन्वीर खान, बिलाल शेख, दिपाली भालेराव. मुख्य प्रशिक्षक : हारुन शेख

श्रुती निकेतनचे संगीत परीक्षेत उज्ज्वल यश

# स्वामिनी नगरकरला संगीत विशारद पदवी

**समाचार/नगर-दि.५**

अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या संगीत परीक्षेत श्रुती संगीत निकेतनच्या विद्यार्थ्यांनी यशाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. नगर (९९) या केंद्रात अन्वय परदेशी, शार्दुल खोल्लम, शौनक कुलकर्णी, गौरी बिडकर, स्वामिनी नगरकर, डॉ.हृषिकेश कुलकर्णी हे विद्यार्थी विविध परीक्षांमध्ये गायनात व हार्मो नियम वादनात केंद्रात प्रथम आले आहेत.



स्वामिनी नगरकर या विद्यार्थीनीनी प्रथम श्रेणीसह संगीत विशारद ही परीक्षा उत्तीर्ण केली आहे. परीक्षा निहाय निकाल - प्रारंभिक - ऋत्वीका कुलकर्णी, तामिरा तेजस्विनी, ओवी सोनवणे, श्रिराज कराळे, अनुज भालेराव, पियूष सानप, अंशुमन वाणे, अलंकृता जगताप, कृष्णा साखला, शांभवी साखला, गिरीश दैतुल, मयुरेश मुंगी. प्रवेशिका प्रथम - अन्वय परदेशी, स्वानंदी देशमुख, निर्मिती गवळी, राजवीर काशीद, निषाद पानसरे, अस्मी खामीतकर, सोहम देशमुख, सौम्या देशमुख, स्मिता देशमुख, शराली काळे, रोहित तांबोळी. प्रवेशिका पूर्ण - शार्दुल खोल्लम, अमृता औटी, अपूर्वा जोगदे, सोहम भंडारी, आराध्या गाडळकर, उर्वी दैवज्ञ, राशी मंडलेचा, आर्या कावळे, वैष्णवी पटवा, प्रीती गांधी, आरोही बेडेकर, सुरेश पवार, अलका केळकर, जय बोरा, मध्यमा पूर्ण : शौनक कुलकर्णी, स्वानंद बांदल, शिल्पा मुळगुंद, वैष्णवी मोरे, गुंजन गोले, विशारद प्रथम : गौरी बिडकर. विशारद पूर्ण : स्वामिनी नगरकर, अलंकार प्रथम : डॉ.हृषिकेश कुलकर्णी, अनुजा कुलकर्णी, सर्व विद्यार्थ्यांना पुष्पा औटी, डॉ.धनश्री खरवंडीकर आणि मकरंद खरवंडीकर यांचे मार्गदर्शन लाभले.

हिंद सेवा मंडळाची वार्षिक सभा खेळीमेळीत

# सर्व विषय एकमताने मंजूर

**समाचार/नगर-दि.५**

हिंद सेवा मंडळ शैक्षणीक संस्थेच्या झालेल्या सर्वसाधारण सभेत सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेस मानद सचिव संजय जोशी यांच्यासह सर्व संचालक, शिक्षक प्रतिनिधी व मोठ्या संख्यने जिल्ह्यातून आलेले सभासद उपस्थित होते. विषय पत्रिकेवरील सर्व विषय उपस्थित सभासदांनी एकमताने मंजूर केले. अजेंड्यावरील विषयांवर चर्चा सुरु असतानाच संस्थेचे सभासद संजय घुले यांनी संस्थेच्या सभासदांना भाडोत्री सभासद असे संबोधल्याने सभेत थोडा वेळ गोंधळ उडाला. यावेळी संतप्त झालेल्या सभासदांनी संजय घुले यांना चांगलेच धारेवर धरले. सारडा महाविद्यालयाच्या



प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित, ईश्वर बोरा, प्रा.स्मिता भुसे, संजय छल्लारे व श्रीरामपूरचे माजी नगराध्यक्ष रवींद्र गुलाटी यांनी संजय घुले यांचे सभासदत्व रद्द करण्याची जोरदार मागणी केली. त्यामुळे संजय घुले यांनी ताबडतोब सभेची जाहीर माफी मागितली. त्यांनतर सभेचे कामकाज पुन्हा सुरळीत झाले. संस्थेचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक यांनी सभासदांच्या प्रश्नांना समाधान कारक उत्तरे दिल्याने ही सभा साधकबाधक चर्चने संपन्न झाली.

प्रा.शिरीष मोडक म्हणाले, हिंद सेवा मंडळ शैक्षणिक क्षेत्रात चौफेर प्रगती करत आहे. यामध्ये संस्थेच्या संचालक, सभासद, शिक्षक व कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान आहे. संस्थेचा प्रगतीचा चढता आलेख वार्षिक सभेत मांडताना समाधान वाटत आहे, असे सांगून विषय पत्रिकेवरील सर्व विषय सभेसमोर मंजुरीसाठी मांडले. उपस्थित सभासदांनी सर्व विषय एकमताने मंजूर केले.

ब्रिजलाल सारडा म्हणाले, गेल्या १०० वर्षांपासून संस्था नि:स्वार्थ भावनेने शैक्षणिक कार्य करत आहेत. अनेक अडचणींवर मात करत संस्था भक्कम पायावर उभी आहे. सभासदांनी या कार्यास अशीच साथ द्यावी, असे आवाहन केले. प्रास्ताविकात सचिव संजय जोशी यांनी केले. सतीश लोढा यांची राष्ट्रीय जैन कॉन्फरन्सच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल, तसेच ज्येष्ठ संचालक रणजीत श्रीगोड व ईश्वर बोरा यांचा सन्मान संस्थेच्या वतीने करणात आला. यावेळी हिंद सेवा मंडळाच्या सर्व शाळांचे चेअरमन, शिक्षक प्रतिनिधी उपस्थित होते.

## दोन हजारापेक्षा अधिक धावपटूंची नोंदणी

# नगरमध्ये रविवारी रंगणार 'रनर्स'चा महाकुंभ

**समाचार/नगर-दि.०५**

महाराष्ट्रात नावाजलेली व जिल्ह्यातील सर्वात मोठी मानाची हाफ मॅरेथॉन म्हणून ओळख असलेली नगर रायझिंग मॅरेथॉन यंदा रविवारी (ता. ९) आयोजित करण्यात आली आहे. या मॅरेथॉनचे आयोजन नगर रायझिंग फाउंडेशनने केले आहे.

या स्पर्धेसाठी दोन हजारपेक्षा जास्त धावपटूंनी सहभाग नोंदविला आहे. यंदाचे हे नववे वर्ष आहे. टाईमपास फेम प्रथमेश परब सह प्रसिद्ध मराठी अभिनेते व अभिनेत्री या स्पर्धेत आकर्षणाचा केंद्र ठरणार आहेत, अशी माहिती नगर रायझिंग फाउंडेशनचे अध्यक्ष उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांनी



दिली.

ही मॅरेथॉन २१ किलोमीटर, १० किलोमीटर व ४ किलोमीटर अशा तीन कॅटेगरीजमध्ये होईल. स्पर्धेची सुरुवात अहमदनगर क्लब, अहिल्यानगर जवळील हत्तीच्या पुतळ्यापासून होईल. २१ किलोमीटरची मॅरेथॉन रविवारी (ता. ९) सकाळी ५.४५ वाजता, १० किलोमीटरची सकाळी ६.३० वाजता तर ४ किलोमीटरची मॅरेथॉन ७.३० वाजता सुरू होईल. मॅरेथॉन निमित्त रविवारी (ता. ९) पहाटे ५ वाजेपासूनच विविध फिटनेस कार्यक्रमांचे अहमदनगर क्लब, अहिल्यानगर मध्ये आयोजन करण्यात आले आहे.

शनिवारी (ता. ८) एक्स्पो मध्ये सहभागी होण्यासाठी सायंकाळी टाईमपास फेम प्रथमेश परब येत आहे. तसेच रविवारी (ता. ९) एक राधा एक मीरा या आगामी फिल्म मधील गश्मीर महाजनी, मृण्मयी देशपांडे, सुरभी भोसले आणि संदीप पाठक हे कलावंत उपस्थित राहणार आहेत. तसेच सोनी मराठीवरील बहुचर्चित असणारा 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमातील पृथ्वीक प्रताप आणि दत्तू मोरे हे सध्या गाजणारे चेहरे मॅरेथॉनच्या उद्घाटनाच्या सोहळ्यात सहभागी होणार आहेत.

या स्पर्धेसाठी सहभागी स्पर्धकांची किट शनिवारी (ता. ८) दुपारी १ ते सायंकाळी ८ या वेळेत अहमदनगर क्लब येथे मिळणार आहे. यंदाच्या मॅरेथॉनमध्ये नगर जिल्ह्यातील अनेक प्रतिष्ठित नागरिक सहभागी होणार आहेत.


## चाहिए

साऊथ इंडियन हॉटेल के लिए एक शेफ/बावर्ची और दो वेटर चाहिए।
अच्छी वेतन / सॅलरी।
संपर्क करे-
मो. नं. 8605307917



## २ फ्लॅट विकणे आहेत

● मानकर गल्ली, दिल्लीगेट, नगर
600 sq.ft (1 BHK)
● कल्याण रोड, जिजाऊ नगर, हराळ हॉस्पिटल मागे, नगर
600 sq.ft (1 BHK)
संपर्क : दिकोंडा क्लासेस्
मो.नं. 8329152257 (दुपारी ४ नंतर)



## -: पाहिजेत :-

◆ रिसेप्शनिस्ट - १
संगणक व अकौंटसचे ज्ञान आवश्यक
◆ OT Assistant - १
◆ वॉर्ड बॉय - २
अनुभव आवश्यक
◆ ड्रायव्हर - १
(हॉस्पिटलमध्ये इतर कामे करण्याची तयारी, राहण्याची सोय.)
- अर्जासह समक्ष भेटा -
डॉ. सांगळे हॉस्पिटल
बुरुडगाव रोड, अहिल्यानगर
मो. 9405807037



टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात
दि.३१/०१/२०२५ ते दि.०६/०२/२०२५



DEVA (हिंदी)
07.45 AM 09.15 AM 10.45 AM
01.45 PM 02.30 PM 04.45 PM
07.45 PM 10.45 PM

SKY FORCE (हिंदी)
09.30 AM 12.00 PM 05.30 PM
08.00 PM 10.30 PM

ILU ILU 1998 (हिंदी)
04.15 PM

मुक्काम पोस्ट देवाचं घर (मराठी)
02.00 PM

JOURNEY (हिंदी)
12.15 PM

फसक्लास दाभाडे (मराठी)
06.30 PM

PUSHPA RELOAD
09.30 PM

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher *
- Offer Vaild On Window Booking & Phone Booking
Ahilyanagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse
AVAILABLE ON book my show
CONNPLEX
AVAILABLE ON book my show
3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002


# 'आनंदऋषीजी'मध्ये उद्या मोफत तपासणी शिबीर



**समाचार/नगर-दि.०५**

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पीटलमध्ये गुरूवार दि.६ फेब्रुवारी ला सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत छातीविकार व ॲलर्जीसाठी मोफत तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरात फुफ्फुसाचे सर्व आजार, झोपेसंबंधीचे सर्व विकार, ॲलर्जी विकार, दमा, न्युमोनिया, न थांबणारा खोकला ही लक्षणे असणाऱ्या रूग्णांसाठी मोफत तपासणी करण्यात येणार असून सवलतीच्या दरात तपासणी केली जाणार आहे. पुणे प्रतिथयश- निष्णात फुफ्फुस विकार तज्ञ डॉ. स्नेहा तिरपुडे या रूग्णांची तपासणी करून उपचाराविषयी मोफत मार्गदर्शन करणार आहेत.

आनंदऋषीजी हॉस्पीटलमध्ये हायटेक पॅथॉलॉजी लॅब व ३५ अत्याधुनिक डायलेसिस मशिनव्दारा सेवा उपलब्ध आहे. डिजिटल एक्स रे २५० रुपये, सोनाग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ८०० रुपये, सिटी स्कॅन १२५० रुपये तर एमआरआय २५०० रुपयात केले जाते. याशिवाय आनंदऋषीजी ब्लड बँक सेवा २४ तास उपलब्ध आहे. या शिबिराचा गरजू रूग्णांनी लाभ घ्यावा. तसेच शिबिराच्या अधिक माहितीसाठी ०२४१-२३२०४७३७४७५७६ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आनंदऋषीजी हॉस्पीटलच्या वतीने करण्यात आले आहे.

## डॉ.विखे वैद्यकीय कॉलेजचा उपक्रम

# मांजरसुंबा गडावर राबविले स्वच्छता अभियान



**समाचार/नगर-दि.०५**

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी मांजरसुंबा गडावर पडलेला सुमारे ३५ गोण्या प्लॅस्टिकचा कचरा गोळा केला. या कार्यासाठी जणू त्यांच्यात चढाओढ लागली होती. अतिशय उत्साहात गडाची स्वच्छता मोहीम विद्यार्थ्यांनी राबविली.

ट्रेक कॅम्पचे संस्थापक विशाल लाहोटी यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. भल्या पहाटेच सर्व विद्यार्थी कॉलेजमधून निघाले. सर्वजण मांजरसुंबा गडाच्या पायथ्याशी पोहोचल्यानंतर लाहोटी यांनी उपस्थित विद्यार्थी व प्राध्यापकांना मोहिमेविषयी माहिती सांगितली.

शारीरिक कसरती केल्यानंतर सर्वजणांना हातमोजे व गोण्या देण्यात आल्या. विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या गटाने गड चढतानाच प्लॅस्टिकचा कचरा उचलण्यास सुरुवात केली. गडावर गेल्यानंतर तेथील महालाजवळचा परिसर, तसेच मागील बाजूस असणाऱ्या हौदात पडलेल्या प्लॅस्टिकच्या बाटल्या, पिशव्या, खाद्य पदार्थांचे रॅपर आदी ३५ गोण्या कचरा गोळा केला. स्वच्छता करताना अनेकांनी सेल्फीही घेतले. त्यानंतर चुलीवरची कॉफी व चटकदार भेळ विद्यार्थ्यांना देण्यात आली. गोळा केलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी सर्व अॅपच्या व्हॅनने पूर्ण केली.


## २ घर विकणे आहेत

भावनाऋषी सोसा., कल्याणरोड येथील सर्व सोयींयुक्त १ रुम किचनची दोन घरे त्वरित विकणे आहे.
-: संपर्क :-
9850791142


## ग्रामपंचायत पांगरी, ता. अकोले, जि.अहिल्यानगर — निविदा नोटीस

खालील कामांच्या बी-१ निविदा दोन लिफाफा पद्धतीने ग्रामपंचायत पांगरी, ता. अकोलेच्या वतीने योग्य त्या नोंदणीकृत मक्तेदारांकडून मागविणेत येत आहे. कामांबाबत निविदा अटी व शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमुद केला असून कोरा निविदा संच दि.०६/०२/२०२५ ते १३/०२/२०२५ पर्यंत सकाळी १० ते ५ या वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात रोखीने अथवा धनाकर्ष भरणा करून उपलब्ध आहे. परीपूर्ण भरलेल्या निविदा वरील कालावधीतच सादर करणे बंधनकारक आहे. निविदा दि. १४/०२/२०२५रोजी शक्य झाल्यास सकाळी ११.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील. निविदा अटी व शर्तीमध्ये बदल करणे अथवा प्राप्त निविदांपैकी कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणेचा अधिकार ग्रामपंचायतने राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे पांगरी येथील स्मशानभूमी सुशोभिकरण करणे. | १५ वा वित्त आयोग | १,६६,२४९/- | ७ व पुढील |
| २ | मौजे पांगरी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कडाळेवाडी दुरुस्ती करणे. | १५ वा वित्त आयोग | १,२९,१२९/- | ७ व पुढील |
| ३ | मौजे पांगरी येथे कडेवाडी अंगणवाडी कॉंक्रीटीकरण रॅम्प बनविणे. | १५ वा वित्त आयोग | ६१,३५८/- | ७ व पुढील |
| ४ | मौजे पांगरी येथील स्मशानभूमी दुरुस्ती करणे. | १५ वा वित्त आयोग | १,४१,७६८/- | ७ व पुढील |
| ५ | मौजे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कंम्पाउंड बांधकाम करणे. | १५ वा वित्त आयोग | १,६७,३०५/- | ७ व पुढील |

*** टिप - १) निविदा फी - प्रत्येकी १००/- रुपये,**
**२) काम पुर्णत्वाचा कालावधी - प्रत्येकी ३ महिने**

**ग्रामसेवक सरपंच**
**ग्रामपंचायत पांगरी, ता. अकोले, जि.अहिल्यानगर**



**श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या शाळेमधील मुलांनी जागतिक सुर्यनमस्कार दिनानिमित्त १ हजार मुलांनी प्रत्येकी ११ सुर्यनमस्कार घातले. यावेळी मुलांनी ११ वेळा मनाच्या श्लोकांचेही पठण केले.**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत सय्यद युसुफ गफुर व सय्यदचाँद गफुर यांचे वारस सय्यद नसीम रफी, सय्यद सायरा इरफान, सय्यद इजाज युसुफ, सय्यद नाजीमा फारुक, सय्यद आयाज सुयुफ, सय्यद रियाज चाँद, सय्यद फिरोज चाँद, शेख शगुफ्ता अलताफ रा. माणिकचौक, अहमदनगर यांचे मालक आहेत. सदर मिळकती संदर्भात मिळकतीचे मालकांनी आमचे अशिल **रमेश घेवरचंद बोरा यांचे वारस संदीप रमेश बोरा, बापूसाहेब नानासाहेब शिंदे, मन्नु वीर अग्रवाल, अशोक रामचंद्र ढगे** यांचे सोबत मिळकत विक्रीचा साठेखताचा करारनामाचा व्यवहार केलेला असून त्याबाबत आमचे अशिलांनी मिळकतीचे मालकांविरुध्द अहमदनगर येथील मे. कोर्टात **स्पे.मु.नं. ९८६/२००६** तसेच **१८७/२००६** चा दावा मिळकतीचे साठेखतावरुन खरेदीखत मिळणेकामी दाखल केलेला असून सदर दाव्याचे कामकाज मे. कोर्टात प्रलंबित आहे. अशी परिस्थिती असतानाही मिळकतीचे मालक व तसेच द्रोपदाबाई गंगाधर हरेर, नंदकुमार गंगाधर हारेर, संतोष गंगाधर हारेर, मंगल काशिनाथ लोखंडे, संगीता सुरेश पवार, सविता मारुती कळसाईत, अनिता प्रकाश जवणे हे संगनमताने मिळकत विक्री करण्याचे प्रयत्नात आहेत. त्याबाबत नुकतेच अनेक इसमांनी आमचे अशिलांकडे विचारपूस केलेली आहे. तेव्हा आमचे अशिलांना मिळकतीचे मूळ मालक व इतर हे संगनमताने बेकायदेशीररित्या मिळकत तिऱ्हाईत इसमास विक्री करण्याचे प्रयत्नात असल्याची माहिती प्रथमतः झाली. सदर मिळकतीबाबत कोणीही, कोणत्याही प्रकारचे व्यवहार करु नयेत मिळकतीबाबत हस्तांतराचे व्यवहार केल्यास आमचे अशिलांवर बंधनकारक नाहीत. तसेच लिहून घेणार यांचे विरुध्द आमचे अशिल योग्य ती दिवाणी व फौजदारी स्वरुपाची कायदेशीर कारवाई करतील. खरेदी घेणाऱ्यास मालकी हक्क अगर ताबा मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट-अ**

**मिळकतीचे वर्णन - डिस्ट्रीक्ट अहमदनगर सब डि. व तालुका नगर पैकी मौजे सावेडी येथील जुना सर्व्हे नं. ८२ चा गट नं. ९६ पैकी विभाजन होऊन झालेला गट नं. ९६ / १, क्षेत्र ७ हेक्टर ३५ आर, आकार १२ रू. २१ पैसे याप्रमाणे**

**चतुःसीमा : पूर्वेस** - सर्व्हे नं. ९४, **दक्षिणेस** - सर्व्हे नं. ९७,
**पश्चिमेस** - सर्व्हे नं. ११७ व १११, **उत्तरेस** - सर्व्हे नं. ७५

सबब या नोटीसीने कळविण्यात येते की, वरील मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारे हस्तांतर करु नये केल्यास ते आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**ता. ०५/०२/२०२५**
**अहमदनगर**

**ॲड.वेद किशोर देशपांडे**
ऑफिस: कोर्ट यार्ड, ई-बिल्डींग, पहिला मजला,
तारकपूर बस स्टॅण्ड समोर, अहमदनगर, मो.नं. ९६०४६९७४३९

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत ही विद्यमान मालक नामे किमया प्रकाश काणे, रा. औंध, पुणे यांचे मालकी वहिवाटीची व प्रत्यक्ष कब्जात असलेली मिळकत त्यांनी आमच्या अशिलाबरोबर विक्री करण्याबाबतचा व्यवहार ठरविलेला आहे व त्याअनुषंगाने खरेदीखत करण्याचे ठरलेले आहे. विद्यमान मालकांनी मिळकत निर्वेध व निजोखमी, बिनबोजाची असल्याचा विश्वास व भरोसा आमच्या अशिलांना दिलेला आहे. यदाकदाचित कोणाचीही कोणतीही तक्रार अगर हरकत अथवा गहाण, दान, पोटगी, साठेखत, अव्वल जप्ती, मनाई हुकूम, वहिवाट, कुळ, बोजा, कर्ज अथवा इतर कोणाचाही हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत खाली दिलेल्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी भेटून खात्री पटवून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचीही तक्रार चालणार नाही.

**परिशिष्ट -**

**मिळकतीचे वर्णन :** डि।। अहमदनगर (अहिल्यानगर) सब डि।। तालुका कर्जत पैकी मौजे होलेवाडी येथील शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

| गट नंबर | क्षेत्रफळ - हे.आर.चौ.मी. | आकार रु.पैसे. |
|---|---|---|
| ७४ | ८.३७.०० | ३.५० |
| | **पो.ख.** ५.९३.०० | |
| | **एकूण** १४.३०.०० | |

**यासी चतु:सीमा- महसूल दप्तरी रेकॉर्डप्रमाणे**

येणेप्रमाणे चतु:सीमापूर्वक मिळकत शेतजमीन मिळकती त्यामधील तदंगभूत वस्तू, वाग, वहिवाटीचे हक्कासह काहीएक राखून न ठेविता.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

**दिनांक : ०४/०२/२०२५**
**अहिल्यानगर**

**विद्यमान मालक :**
**किमया प्रकाश काणे**

**ॲड. स्वप्निल रविकुमार देवकर**
नोटरी पब्लिक (भारत सरकार)
पत्ता - निवास / ऑफिस घर नं.१९०, देशमुख गल्ली,
शमी गणपती मागे, दिल्लीगेटजवळ, अहिल्यानगर - ४१४००१
मो.नं. ७५८८६९५८३०, ९४०५०३४५४०

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत ही विद्यमान मालक नामे प्रकाश लक्ष्मण काणे, रा. औंध, पुणे यांचे मालकी वहिवाटीची व प्रत्यक्ष कब्जात असलेली मिळकत त्यांनी आमच्या अशिलाबरोबर विक्री करण्याबाबतचा व्यवहार ठरविलेला आहे व त्याअनुषंगाने खरेदीखत करण्याचे ठरलेले आहे. विद्यमान मालकांनी मिळकत निर्वेध व निजोखमी, बिनबोजाची असल्याचा विश्वास व भरोसा आमच्या अशिलांना दिलेला आहे. यदाकदाचित कोणाचीही कोणतीही तक्रार अगर हरकत अथवा गहाण, दान, पोटगी, साठेखत, अव्वल जप्ती, मनाई हुकूम, वहिवाट, कुळ, बोजा, कर्ज अथवा इतर कोणाचाही हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत खाली दिलेल्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी भेटून खात्री पटवून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचीही तक्रार चालणार नाही.

**परिशिष्ट -**

**मिळकतीचे वर्णन :** डि।। अहमदनगर (अहिल्यानगर) सब डि।। तालुका कर्जत पैकी मौजे होलेवाडी येथील शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

| गट नंबर | क्षेत्रफळ - हे.आर.चौ.मी. | आकार रु.पैसे. |
|---|---|---|
| ७३ | ५.२६.०० | ४.१३ |
| | **पो.ख.** १.१९.०० | |
| | **एकूण** ६.४५.०० | |

**यासी चतु:सीमा- महसूल दप्तरी रेकॉर्डप्रमाणे**

येणेप्रमाणे चतु:सीमापूर्वक मिळकत शेतजमीन मिळकती त्यामधील तदंगभुत वस्तू, वाग, वहिवाटीचे हक्कासह काहीएक राखून न ठेविता.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

**दिनांक : ०४/०२/२०२५**
**अहिल्यानगर**

**विद्यमान मालक :**
**प्रकाश लक्ष्मण काणे**

**ॲड. स्वप्निल रविकुमार देवकर**
नोटरी पब्लिक (भारत सरकार)
पत्ता - निवास / ऑफिस घर नं.१९०, देशमुख गल्ली,
शमी गणपती मागे, दिल्लीगेटजवळ, अहिल्यानगर - ४१४००१
मो.नं. ७५८८६९५८३०, ९४०५०३४५४०

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत ही विद्यमान मालक नामे अमिया प्रकाश काणे, रा. औंध, जि. पुणे यांचे मालकी वहिवाटीची व प्रत्यक्ष कब्जात असलेली मिळकत त्यांनी आमच्या अशिलाबरोबर विक्री करण्याबाबतचा व्यवहार ठरविलेला आहे व त्याअनुषंगाने खरेदीखत करण्याचे ठरलेले आहे. विद्यमान मालकांनी मिळकत निर्वेध व निजोखमी, बिनबोजाची असल्याचा विश्वास व भरोसा आमच्या अशिलांना दिलेला आहे. यदाकदाचित कोणाचीही कोणतीही तक्रार अगर हरकत अथवा गहाण, दान, पोटगी, साठेखत, अव्वल जप्ती, मनाई हुकूम, वहिवाट, कुळ, बोजा, कर्ज अथवा इतर कोणाचाही हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत खाली दिलेल्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी भेटून खात्री पटवून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचीही तक्रार चालणार नाही.

**परिशिष्ट -**

**मिळकतीचे वर्णन :** डि।। अहमदनगर (अहिल्यानगर) सब डि।। तालुका कर्जत पैकी मौजे होलेवाडी येथील शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

| गट नंबर | क्षेत्रफळ - हे.आर.चौ.मी. | आकार रु.पैसे. |
|---|---|---|
| ७० | ३.०६.०० | ३.५० |
| | **पो.ख.** १.२३.०० | |
| | **एकूण** ४.२९.०० | |

**यासी चतु:सीमा- महसूल दप्तरी रेकॉर्डप्रमाणे**

येणेप्रमाणे चतु:सीमापूर्वक मिळकत शेतजमीन मिळकती त्यामधील तदंगभूत वस्तू, वाग, वहिवाटीचे हक्कासह काहीएक राखून न ठेविता.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

**दिनांक : ०४/०२/२०२५**
**अहिल्यानगर**

**विद्यमान मालक :**
**अमिया प्रकाश काणे**

**ॲड. स्वप्निल रविकुमार देवकर**
नोटरी पब्लिक (भारत सरकार)
पत्ता - निवास / ऑफिस घर नं.१९०, देशमुख गल्ली,
शमी गणपती मागे, दिल्लीगेटजवळ, अहिल्यानगर - ४१४००१
मो.नं. ७५८८६९५८३०, ९४०५०३४५४०

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत ही विद्यमान मालक नामे कविता प्रकाश काणे, रा. औंध, पुणे यांचे मालकी वहिवाटीची व प्रत्यक्ष कब्जात असलेली मिळकत त्यांनी आमच्या अशिलाबरोबर विक्री करण्याबाबतचा व्यवहार ठरविलेला आहे व त्याअनुषंगाने खरेदीखत करण्याचे ठरलेले आहे. विद्यमान मालकांनी मिळकत निर्वेध व निजोखमी, बिनबोजाची असल्याचा विश्वास व भरोसा आमच्या अशिलांना दिलेला आहे. यदाकदाचित कोणाचीही कोणतीही तक्रार अगर हरकत अथवा गहाण, दान, पोटगी, साठेखत, अव्वल जप्ती, मनाई हुकूम, वहिवाट, कुळ, बोजा, कर्ज अथवा इतर कोणाचाही हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत खाली दिलेल्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी भेटून खात्री पटवून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचीही तक्रार चालणार नाही.

**परिशिष्ट -**

**मिळकतीचे वर्णन :** डि।। अहमदनगर (अहिल्यानगर) सब डि।। तालुका कर्जत पैकी मौजे होलेवाडी येथील शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

| गट नंबर | क्षेत्रफळ - हे.आर.चौ.मी. | आकार रु.पैसे. |
|---|---|---|
| ७२ | ५.९१.०० | ५.१९ |
| | **पो.ख.** १.९५.०० | |
| | **एकूण** ७.८६.०० | |

**यासी चतु:सीमा- महसूल दप्तरी रेकॉर्डप्रमाणे**

येणेप्रमाणे चतु:सीमापूर्वक मिळकत शेतजमीन मिळकती त्यामधील तदंगभूत वस्तू, वाग, वहिवाटीचे हक्कासह काहीएक राखून न ठेविता.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

**दिनांक : ०४/०२/२०२५**
**अहिल्यानगर**

**विद्यमान मालक :**
**कविता प्रकाश काणे**

**ॲड. स्वप्निल रविकुमार देवकर**
नोटरी पब्लिक (भारत सरकार)
पत्ता - निवास / ऑफिस घर नं.१९०, देशमुख गल्ली,
शमी गणपती मागे, दिल्लीगेटजवळ, अहिल्यानगर - ४१४००१,
मो.नं. ७५८८६९५८३०, ९४०५०३४५४०